नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

मुखपत्र
युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

★

कविता

१ आता—'पद्मा' ...६६
२ आसवें—इंदिरा संत ...६६
३ मैना बोले—प्रा. पु. शि. रेगे, बी. एस्‌सी. ...६६
४ उषा—प्रा. दा. ल अडोणी, एम्‌.ए. ...६७
५ इशारा—ना. ना. हुड, बी. ए., एल एल. बी. ...६७

साहित्यिकाचा परिचय

१ वामन रामचंद्र कांत—बी. रघुनाथ ...६८

प्रबंध

१ ज्ञानेश्वरींतील एका ओवीविषयीं प्राचीन मराठीच्या दृष्टीने अधिक अर्थप्रकाश—प्रि. द. ना. नेने, एम. ए., एल. टी. ...७१
२ संस्कृत-साहित्य-शास्त्रांतील औचित्य-विचार—प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, एम. ए., एल एल. बी. ...७५
३ भावगीत-प्रा. म. श्री. पंडित, एम्‌. ए. ८१
४ मराठीच्या माहेरांत—श्री. न. द्दो. पोहनेरकर साहित्य-विशारद ..८५

ललित गद्य

२ हेन्री ! क्रूत्र !—द. चिं. सोमण ...८९

विविध

१ गुप्त सरस्वती ...९२
२ संपादकीय ...९४

साभार पोंच

★

विशेषांक —

१. मातृभूमि—दिवाळी—विशेषांक— (सं. प्रमिला ओक, राजस्थान प्रेस, अकोला, किं. रु. १॥)

२. चित्रमयजगत्—स्वातंत्र्य अंक (सं. त्र्यं. र. देवगिरीकर, चित्रशाळा प्रेस, पुणें, किं रु २॥)

३ नवयुग-स्वातंत्र्य-अंक (सं. आचार्य अत्रे, अत्रे प्रिंटिंग प्रेस, मुंबई. किं. १ रु.)

तरुण भारत विशेषांक १९४७ (सं. ग. त्र्यं. माडखोलकर, तरुण भारत प्रेस, नागपूर. किं. रु. १॥)

वरील चारहि विशेषांक आपापल्या परीने उत्तम आहेत. असे वाचनीय अंक काढल्याबद्दल या नियतकालिकांच्या संपादकांचें अभिनंदन करावयास पाहिजे.

नियत कालिकें—

१. साहित्य—जानेवारी १९४७ (सं. वा रा. ढवळे, मुंबई-मराठी-साहित्य-मुंबई, किं. रु. २॥)

२. सह्याद्रि (सं. दि. वि. काळे, केसरी छापखाना, पुणें)

३. स्वदेश (सं. वि. वा. शिरवाडकर व रमाकांत वेलदे, नासिक, वा. व. रु. १३)

'साहित्य' व 'स्वदेश' या नूतन भावंडांचें 'युगवाणी' स्वागत करते. 'साहित्या'चा अंक बाह्यांग व अंतरंग या दोन्ही दृष्टींनी उत्कृष्ट आहे.

—पुस्तकावरील अभिप्राय सवडीप्रमाणें देण्यांत येतील.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक ३ रा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

मार्च
१९४७

चालू अंकांतील कवि व त्यांच्या कविता

---

१ आता—आधुनिक मराठींतील सर्वोत्तम कवयित्रींत 'पद्मा' यांची गणना होते. त्यांच्या कवितेंतील आर्तता व नाजुकपणा हे गुण उल्लेखनीय आहेत. प्रस्तुत कविता या विधानाची साक्ष पटवील. त्यांचा 'प्रीतिपथावर' संग्रह एवढ्यांत प्रसिद्ध होत आहे.

२ आसवें—कै. ना. मा. संत व त्यांच्या पत्नी इंदिरा संत हें साहित्यिक दांपत्य महाराष्ट्रांत मशहूर आहेच. ना. मा. संत यांच्या अकाल निधनाच्या पार्श्वभूमीवर ही कविता चटका लावणारी ठरते.

३ मैना बोले—प्रा. रेगे यांच्या या चुटक्यांतील संवाद त्रुटित, पण खटकेदार व सूचक आहेत.

४ उषा—सागर विश्वविद्यालयांतील मराठीचे प्राध्यापक दा. ल. अडोणी यांनी ऋग्वेदांतील उषेसंबंधींच्या सूक्तांची सरस रूपांतरें केलीं आहेत. त्यांचा संग्रह लौकरच प्रसिद्ध होणार आहे. त्यांपैकीं एक रूपांतरित कविता येथें देण्यांत येत आहेत.

प्रा. अडोणी यांनी कांहीं अनुवाद मूळ वैदिक छंदांत करावे, अशी त्यांत सूचना आहे.

५ इशारा—यवतमाळचे वकील ना. ना. हूड यांचा 'पराग' काव्यसंग्रह वाचकांपुढे आहेच. शर्लेच्या कवितेचा त्यांनी केलेला अनुवाद विषयदृष्ट्या चालू परिस्थितीस लागू पडणारा आहे.

या अनुवादांत छंदस्त्व दिसत नाही! हा मुक्तछंदहि नव्हे! अशा प्रकारची स्वैर रचना अलीकडे मराठींत बरीच होत आहे. तिच्या इष्टानिष्टतेची चर्चा होणें जरूर आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आता—

आता कळतो ग आई !
अर्थ तुझ्या वेदनांचा
आणि हळव्या सुखांचा
—दुःखांचाही !

आई, आता दिसतो ग
तुझ्या प्रेमळ नेत्रींचा
खेळ ऊनपावसाचा
हळुवार !

जागे झाले ग श्रवण
मूक हुंदके ऐकाया
अर्थ त्यांचा आकळाया
मन माझें !

आता पाहतें जगांत
तुझ्या वत्सल दृष्टीनं
वाटे सौंदर्यनिधान
बाळ माझा !

मोजितें मी सुखदुःख
तुझ्या मायेने अनंत
आता बाळाच्या सुखांत
सुख माझें !

आता एक आस मनीं
एक ध्येय हृदयांत
बाळ व्हावा कीर्तिमंत
चिरंजीव !

आता तुझें वेडे मन
भाग्यें मलाहि लाभलें
आणि पूर्णत्व पावलें
जीवन हें !

हृदीं बाळाला धरितां
आता गहिवरे मन
वाटे पुन्हा बाळपण
यावें मज !

—पद्मा

आसवें—

मैत्रीचें नातें होतें आपुलें जेव्हा
लागून ओढणी सहवासाची तेव्हा
मनिं दाटुनि आल्या गोड भावना नाना
अन् एकांतीं मीं ढाळियले अश्रूंना !

मग जलस्नान त्या फुलासारखें झालें
मग मन माझें ताजें, प्रसन्नतेने भरलें !
मी विवाहमाला तुझ्या घातली कंठीं
मजकडे पाहसी स्वर्ग आणुनि नेत्रीं !

त्या गंभीर मंगल समयीं डोळ्यांमधुनि
निखळलीं आसवें भरलीं मांगल्यानी
घट-सौख्याशेचा हृदयीं आला भरून
जणु त्यांतील आले उसळुन बिंदू दोन

अन् तेव्हापासून कितीकदा नयनांत
साठलीं आसवें, ओघळलीं जोमांत
जे आले अश्रु उसळुन आनंदाने
जाहलीं तयांचीं फुलें तुझ्या स्पर्शाने !

त्या अश्रुफुलांचा गंध जई दरवळला
संसार भासला मधुसुमनांचा झेला !
मन गेलें केव्हा दुःखाने व्याकुळुन !
असहायपणाने भरूनि आले नयन !

तव नजर बोलतां परी शांत गंभीर—
हो इंद्रधनुपरि आर्त, पालटे नूर
जीं तुझ्याचसाठीं आलीं अन् ओघळलीं,
स्पर्शाने तुझिया-फुललीं, खुललीं, हसलीं,

तीं अतां आसवें कुठे जाहलीं गुप्त—
जीं ढाळुन व्हावें दग्ध चित्त हें शांत ?

— इंदिरा संत

मैना बोले

मैना बोले — जिवलग रुसला येइ ना
राघू बोले — आम्ही कांहीं मागूं

मैना बोले — आहे एकच गहिना
राघू बोले — आम्ही भलतें सांगूं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मैना बोले — ओढवली मग दैना
राघू बोले — आम्ही सीधे वागूं

—पुरुषोत्तम शिवराम रेगे

●

उषा

[ऋग्वेद: मंडल: ६: सूक्त: ६४]

अहा ! विलसती उषा विमल शुद्ध वीचीपरी
सुशोभित करोनिया भुवनभाग येती वरी
करी सुगम सत्पथा गगनकन्यका सोज्ज्वल
जनांस नित अर्पिती विपुल वैभवें निस्तुल

उषे ! सुभगदर्शने ! उजळिली तुवां मेदिनी
उडी सहज घेतली तव करीं नभ:प्रांगणीं
द्युलोकदुहिते ! यदा प्रकटितेस तेजोबला
अनावृत गमे स्वयें करिशि रम्य वृक्षस्थला

पहा, सहज हे कसे किरण दीप्त नी आरुण
विशाल नभकन्यका प्रातिथ आणते वाहुन
अमित्रगण नाशिते सुतनु, शूर धन्वीपरी
तशी तिमिरशत्रुला चपल अश्ववाहापरी

कृपा तव पथा करी सुगम अंतराळीं, गिरीं
स्वयंप्रभ उषे ! गमे तरशि तूं नदीच्णेपरी
अये अतुलशोभने ! नभसुते ! रथस्वामिनी !
सभाग्य करण्या अम्हां अमित वित्त ये घेउनी

उषे ! गगनकन्यके ! विचरशी अनिर्बंधशी
सुखें वृषभ आरुणी तुजासि आणती प्रत्युर्षी
प्रभातसमयीं सदा स्तवनपात्र तेजस्विनी !
अतीव कमनीय तूं, सुखव संपदा देऊनी

उषे ! उदय होतसे प्रतिदिनी तुझा ज्या क्षणीं
विहंग उडती नभीं त्वरित सर्व नीडांतुनी
जयांस रुचतो ' हवी ' सदन सोडती ते जन—
तुझ्या निकट राहती भजक, त्यांस देशी धन

●

इषारा

" Victorious men of earth "
—J. shirley.

दुनियेंतल्या अधिपांनो !—
जाहीर नका करूं—
तुमचीं साम्राज्यें आहेत किती भव्य नी विस्तृत !
कबजांत घेतलीं पादाक्रांत करून—
समुद्रवलयांकित पृथ्वी आपल्या—
तरी तुमच्या यश:पताका—
कालावर मात करून—
यावच्चंद्र दिवाकरौ—
फडकत राहतील ही बाळगूं नका घमेंड !
मग्रूर साम्राज्यवाद्यांनो !—
बेफिकीर सम्राटांनो !—
बेगुमान चक्रवर्तींनो !—
तुमची राख—
मृत्यू जेव्हा करील पुकार—
तेव्हा पददलित दीनांच्या राखेंत—
मिसळून गेल्याशिवाय राहणार नाही अखेर !
भकास दुष्काळ, भयाण ग्रंथीज्वर, भेसूर युद्धें
मृत्यूचे हेच यमदूत—
एकेक मानवजातीचा नि:पात करण्यास—
आहेत समर्थ.
पण मृत्यूस नाही त्यांचीही गरज
विंधिण्याला तुम्हांस—
सुसज्ज आहे भाता त्याचा
यापेक्षाही शस्त्रास्त्रांनी नवलपूर्ण.
गोड चुंबन, स्मितहास्य—
यांहीं कुसुम–कोमल शरांनी—
त्याला वाटलें तर, त्याच्याच कौशल्याने—
हृदय भग्न करण्यास येते धार !—
जगज्जेत्यांच्या मालिकेंत आहे
मृत्यूस अग्रपूजेचा मान.
म्हणून तुम्हांस, आक्रमकांस
शेवटचा हाच एक इषारा !!

नारायण नागोराव हूड.

●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वामन रामचंद्र कांत

बी. रघुनाथ.

● औरंगाबादचे कविवर्य वा. रा. कांत यांचा हा परिचय-लेख परभणीचे प्रसिद्ध साहित्यिक 'बी. रघुनाथ' यांनी लिहिला आहे. चटकदार लेखन करण्यांत बी. रघुनाथ यांचा हातखंडा आहे, हें या लेखावरूनहि प्रत्ययास येईल.

★ ★ ★

'मध्ययुगीन' या संबोधनानं हेटाळल्या आणि हिणविल्या जाणाऱ्या आमच्या मराठवाड्यांतच जन्मलेले आणि तेथल्याच बऱ्यावाईट वातावरणांत आपल्या असाधारण कवित्वाचं संवर्धन करणारे कवि **वामन रामचंद्र कांत** यांच्याविषयीं थोडंसं परिचयात्मक आणि गौरवपर लिहावयाचे विचार गेल्या दीडदोन वर्षांपासून माझ्या मनांत जोरकस होत आले होते. एकाच बैठकींत तें लिहून काढूं, असा विश्वास वाटत होता. प्रचोदक क्षणाचीच काय ती वाट होती.

आज लिहायला आरंभ करतांना मनाचा थोडासा गोंधळ उडाला! कांतांविषयीं लिहायचं, म्हणजे अतिशय जपून आणि जमून! या महाकवीवर लिहायचा मला अधिकार काय? कांतांच्या प्रतिभेच्या पैलूपैलूचं संपूर्ण दर्शन घडवितां येईल, असे समर्थ आणि सार्थ शब्द मजजवळ आहेत? जवाहिऱ्यानं जवाहिऱ्याची ओळख करून द्यावी! गारगोट्यांचा संग्रह करणारानं नव्हे!

या विचारांनी उत्साहाच्या लाटांना क्षणभर अडवून धरलं. मग असा विचार आला कीं, राजरस्त्यावरील एखाद्या प्रेक्षणीय इमारतीच्या अथवा एखाद्या मंदिरांतील मनोहर मूर्तीच्या भव्यतेचा आणि रम्यतेचा आपणाला जसा प्रत्यय आला, तसा तो आपल्या तोकड्या शब्दांत सांगणं कांहीं गुन्हा नाही! मी कसंहि आणि कांहींहि लिहिलं, तरी तें कांतांच्या थोरवीमुळं खात्रीनं शोभून दिसेल!

मला प्रकाश दिसला, आपण प्रकाश पाहूं शकतां, हें कळूं लागलं, मला विचार करतां येऊं लागला, मनोविकसनाचीं साधनं निवडतां येऊं लागलीं आणि धडपड करून तीं सुलभ करतां येऊं लागलीं, या गोष्टींनी माझ्या आनंदाला मर्यादा ठेवल्या नाहीत. कांतांची कविता ऐकायला आणि वाचायला मिळाल्यावर अशाच तऱ्हेच्या उच्चतर आनंदानं मी बेहोष होऊन गेलों! त्या सौंदर्याला कल्पनांच्या न् चिंतनाच्या कक्षेंत आणण्यासाठी मनानं तप मांडलं होतं, तें प्रगट झाल्यासारखं दिसलं—नव्हे, गवसलंच!

●

मी हैदराबादीं विद्यार्जन करीत होतों, त्यावेळीं कांतांची कविता विकसूं लागली होती. सुगंधानं गुणग्राहकांचं त्यांच्या सभोंतीं वर्तुळ निर्माण होत होतं. त्यावेळचीं स्थळं, व्यक्ति, प्रसंग, आठवूं लागलं, म्हणजे तीं तशीं असण्यांत, दिसण्यांत आणि घडण्यांत त्यावेळीं न कळलेला विशेषार्थ आता प्रत्ययाला येऊन आठवणींची माधुरी दुणावते. मी 'विवेक वर्धिनी'च्या बोर्डिंगमध्ये होतों. कांत भगवानदास बिल्डिंगवर राहत होते. मोठ्या रस्त्यावरील ती तीन मजली आणि टोलेजंग म्हणतां येईल अशी इमारत आपल्या निवासानं, येण्या-जाण्यानं, चढ-उतरीनं, गाण्यानं आणि गलक्यानं सदैव जागृत ठेवलेली! राजधानींतल्या विद्यामंदिरांनी मराठवाड्यांतला सारा अवखळपणा आपल्याकडं खेचून त्या इमारतींत साठवून ठेवला होता की काय, नकळे! आजचे नामवंत वकील, उत्तम शिक्षक, कांही हिंदु अधिकारी तिथंच निर्माण झाले. तसाच आजचा महाकवि देखील कांही दिवस त्या इमारतींत राहत होता!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांतांची खोली तिसऱ्या मजल्यावर अन् ऐन रस्त्यावर होती. कविवर्यांना पाहण्यासाठी, भेटण्यासाठी आणि त्या वेळच्या अजाण वयांतील माझ्या कांही कविता (!) दाखविण्यासाठी मी वर गेलों. खोलीकडे नेणाऱ्या रुंद फरसबंद रस्त्यावर दोन–तीन कबुतरं ऐटींत चालत होतीं. त्यांच्या पायांत घुंगरं होतीं न् इवल्या पायांच्या हालचालीबरोबर 'छुळ छुळ' 'छुळ छुळ' असा हलुवार आवाज होत होता. कवीच्या दरबारांत निसर्गानं मनोविनोदासाठी आणून सोडलेले हे नर्तनकुशल दूत तर नव्हते ? की कवीच्या मनोमंदिरांत निवासाला आलेल्या सरस्वतीची तीं वाहनं होतीं ?

खोलींत प्रवेश करतांच नवख्या, नम्र आणि विद्यार्थ्यांच्या अस्थिर दृष्टीनं मीं कान्तांना पाहिलं. त्या चेहऱ्याची ठेवण, रेघा (Cut) अपूर्व वाटल्या. जरा वेळानं कवीनं कविता म्हणून दाखविली— "घुंगर पायिं कशाचे ? विहगा ! हे तर लंगर परवशतेचे !......" येतांना दिसलेल्या कबुतरांच्या नादमधुर सोनेरी बंधनांतील नव्याच अर्थाची प्रचीति येऊन मी मंत्र-मुग्ध झालों ! "नाचऱ्या पाखरा ! नूपुरनादाच्या नशेंत बेभान होऊन तूं नाचतो आहेस ! अरे, जरा सावध हो ! आज पाय गुंतले, उद्या पंखांनाहि पाश पडतील !—" असे विलक्षण रम्य विचार कवीनं पुढील ओळींतून मांडले आहेत.

भगवानदास बिल्डिंगवर आता धावपळीचे, आरडाओरडीचे, मुक्त हास्याचे निनाद उठतात की नाहीत, माहीत नाहीं ! तिसऱ्या मजल्यावरच्या रुंद फरसबंद रस्त्यावर पायांत घुंगर असलेलीं पाखरं थयथयत असतात की नाहीत, ऐकिवांत नाहीं ! एका महाकवीच्या लालित्याची लीला मला पहिल्यांदाच दिसली, ती मात्र तिथंच ! त्या बैठकींत कांतांच्या अक्षराचं वळण मीं पाहिलं. प्रथम सुचतील तशा ओळी कागदाच्या कपट्यावर लिहून ठेवायच्या. हे कपटे बांधणीच्या पुठ्ठ्यांत असायचे. कविता पूर्ण झाली आणि मनासारखी ती उतरली की, एका सुबक नोटबुकांत उतरून ठेवायची. या सर्व गोष्टी मला अत्यंत चित्ताकर्षक वाटल्या. आपणहि अशीच पद्धति स्वीकारावी या हेतूनं मी बोहऱ्याच्या दुकानांत आकर्षक बांधणीचीं आणि आकाराचीं नोटबुकं शोधूं लागलों. गंमत अशी की, कांत वाकड्यातिकड्या कागदाच्या तुकड्यावरहि उत्तमोत्तम कविता लिहूं लागले आणि मी मात्र कोरीं नोटबुकंच शोधीत राहिलों !

●

एकदोन वेळां आमच्या वसतीगृहांत, अन् पुढं सेलूला एक विद्वान् संशोधक, लेखक आणि हिंदी मराठी कवितांचे निःसीम भक्त रामचंद्रराव काटे यांच्या घरीं कविवर्यांच्या कविता ऐकायला मिळाल्या. उदयास्ताचे रंग आणि रम्यता, चैतन्य आणि उदासीनता, शस्त्रांच्या पात्यांची चमक, रमणीचे हृदयहारी कटाक्ष, पुष्पांचं उन्मीलन, तारकांचं तेज, नवख्या कवीच्या अर्धोन्मीलित सृष्टींतले हे विषय ! कांतांच्या कवितेनं या विषयांना स्पर्शून भूषविलं तर होतंच ! पण त्यांतहि त्या वेळच्या त्यांच्या विषयांची निवड कमालीची आकर्षक आणि अत्यंत नवलपूर्ण ! कांतांनी नुसती भूमिका सांगितली की, बुद्धीला आणि भावनेला गोडसा धक्का बसलाच म्हणून समजावं ! चांदण्याच्या रंगीत रात्रूमैनांशीं विलोल नि गूढ दृष्टीनं खेळणाऱ्या, खेळतां खेळतांच हंसणाऱ्या किंवा स्तन्यानंतरच्या मस्तीनं चळवळणाऱ्या अर्भकावर कित्येक काव्य-पुष्पं वाहिलीं गेलीं. त्याच्या एकेक लीलेवर विविध उपमा-उत्प्रेक्षांचा वर्षाव केला गेला. पण ज्ञाती जनांनाहि क्षणभर विचारमग्न करविणारी अजाण बालकाची अंगठा चोखण्याची क्रिया काव्यविषय केली ती कांतानीच ! त्याच्या करंगुळींत अमृताचा ठेवा तर नाहीं, असा प्रश्न कांतांच्या कवितेनंच काढला आणि तिनंच सोडविला ! पुष्कळशा कवितांची रसेली नायिका उत्तम गायिका असते. सौंदर्याबरोबर संगीतहि आणण्याचा हट्ट कवीमनाला असतोच. 'प्रियतमे! हृदयसम्राज्ञी ! तुझ्या संगीतानं कदुतर जगताची जाणीव बुजवून टाक' – असं नायक आर्जवून म्हणत असतो. त्याच त्याच हातांत सतारी आणि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सारंग्या दिल्या गेल्यामुळं त्यांचा स्वरकल्लोळ बदसुरानी आरडाओरड वाटूं लागली. 'सखे! गा! गात रहा!' – असं पुनः पुन्हा कळवळून सांगितल्यामुळं रमणीजनांचे कंठ घोगरे आणि खरखर झाले असले पाहिजेत. सारंगी, संगीत, रमणी या मंडळींना कांतांनी काव्याच्या प्रान्तांत आणलं, पण तें अशा रीतीनं आणि परिस्थितींत की त्या कल्पकतेनं नुसतं चाट होऊन जावं! त्यांच्या एका कवितेचा नायक चांगला गायक असतो. मला एखादें गाणें म्हणून दाखवा ना!'– ही पत्नीची विज्ञप्ति त्या कलावंतानं कधीच मनावर घेतली नाही. काळ आला आणि पत्नीचे प्राण हरण करून चालता झाला. तिच्या शब्दांची गायकाला आठवण झाली आणि तो अंतर्बाह्य हलला. स्मशानांत पत्नीची चिता धडधडत होती! अन् त्या ठिकाणीं गायक तिला अखेरचं गाणं ऐकवून दाखवीत होता!...... देशमुखांच्या गादीवर खंजिरी झणकारूं लागली. दारापुढं एक हरिणी थांबल्याचं श्रोत्यांना कळलं. कशाला?— संगीताला भुलून?– तिथं उदयन राजाची 'घोषवती' नव्हती. किंवा 'सारंगा'ची रागदारी नव्हती! खंजिरीवर पोटच्या गोळ्याचं चामडं चढलं होतं. अन् त्या आवाजानं हरिणीच्या काळजाची कालवाकालव झाली होती!... ..

●

कांत नांदेडचे. नांदेडला गोदावरी आहे. आणि गुरुद्वारा आहे. गोदाकाठानं कवित्वाची परंपरा चालविली. इंग्रजी राज्याचं वय होत आलं असूनहि गुरुद्वारानं शस्त्रभक्तीचं संवर्धन केलं. नांदेडचं उष्णतामानहि आजूबाजूच्या स्थानापेक्षा कडक आहे. कांतांच्या वाणींत कमालीचा कडवेपणा आणि भेद करण्याचं सामर्थ्य आढळतं, तो उपरोक्त परंपरा, स्थानमहात्म्य आणि हवामानाचा परिणाम आहे, असं विधान करायला कांहीं हरकत वाटत नाहीं. राजहंसाच्या चाच्यासारखे वेचक, निवडक, अर्थवाही आणि नादगर्भ शब्दच कांतांच्या कवितेंत आढळतात. जें सांगायचं, तें मनाच्या तळापासून निघालेलं असल्यामुळं त्याच्या उद्दाम आवेशांत मन थक्क होऊन जातं! 'सूं सूं सुटुंदे बाण' (फटकार) 'गाशिल कां हें गान?' (युगवाणी) 'झेलझेल पाषाण!' ('अग्निपथ'–'युगवाणी') —हीं गीतं माझं म्हणणं सार्थ करून दाखवितील. नेभळट हातांना गुलाबांचे गेंद गोंजरतां येत नाहीत. तसं शस्त्रहि पेलतां येत नाही. 'वीर' आणि 'शृंगार' हाताळावे, ते कांतांनीच! त्यांची लावण्याखाणि आणि ज्योतिर्मयी कविता अनुरागानं घायाळ करील, तशी रागानं रक्तबंबाळ करून टाकील! अंतर्दहनांत तिच्या मूळच्या कनकमनोरम कांतीला मोटी जहरी धार आल्यासारखी वाटते!

●

'पहाट तार्‍यां'तली कांतांची कविता डोक्यावर घेऊन नाचावं इतकी त्यावेळीं चांगली वाटली. आता ती तशी वाटत नाही. आपल्या संपूर्ण वैशिष्ट्यासह ती 'फटकार' या संग्रहांत झळकली आणि तळपली. दुर्दैव असं की, बाजार भरण्यापूर्वीच तो चिमुकला संग्रह प्रकाशित झाला. आणि, नगरेवाल्यांनी दृष्टीआड केला. ज्यांच्या नजरेखालून तो संग्रह जाणं अवश्यक होतं, तो तसा जाऊनहि 'कॅलेंडर'वर यावा तसा त्रुटित-गंभीर अभिप्राय त्यावर आला आणि संपलं! अमक्या–अमक्या स्टेशनवर खाणावळी आहेत, असा रेल्वेगाइडमध्ये माहितीपूर्ण उल्लेख असतो– अगदी अलीकडं प्रसिद्ध झालेल्या काव्यविषयक पुस्तकांत कांतांविषयीं अशाच स्वरूपाचं टिपण आढळतं!

●

मध्यंतरींची आठदहा लांबलचक वर्षे आमच्या भेटी–गांठीवाचून गेलीं. १९४५ च्या मार्चमध्ये कांत परभणीस आले होते. दूरतेनं शिथिल झालेलीं स्नेहबंधनं या भेटींत दृढतर झालीं. आणि, अलीकडची ताजी कविता ऐकायला मिळाल्यावर मला माझं यौवन परत लाभल्यासारखं वाटलं. या नवनिर्मित विश्वांत केवढीं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मनोहर दृष्यं, किती मधुर कल्पना आणि शब्द-पंक्ति आहेत, म्हणून सांगावं ! त्यांत ‘ बदामी ’ ‘ तपकिरी ’ आणि ‘ मुलायम ’ नेत्राच्या युवति आहेत. झोपडींतले दिवे सहज विझविणाऱ्या वाऱ्याला आकाशांतलीं नक्षत्रं उडवून तर पहा, असं सांगणारी कल्पकता आहे. ओल्या मानव-चर्माचं निशाण मिरविणारा काळपुरुष आहे. मूर्तिभंजन आहे आणि भविष्य घडविणारे हिमालय आहेत !

सत्कार्याचे नगारे झडवूनहि काळाला लवकर जाग येत नाही. वेळ आली, म्हणजे मुंगीच्या पावलाच्या आवाजानंहि तो जागा होतो. जाग आल्यावर कांतांची कविता दिसतांच आपल्या निद्रेची, अंधत्वाची, आणि उपेक्षाबुद्धीची खंत वाटल्याशिवाय त्याला राहणार नाही. जिचं ध्यान करावं आणि ध्यास घ्यावा, अशी ही कविता आहे. जिवंत मनाच्या व्यथा आणि विलास तींत आहेत. आमच्या जीवनाला जी धग वाधते आहे आणि आम्हाला जीं स्वप्नं पडत आहेत, तीं तींत आहेत. ‘ निखाऱ्यांत मम पंख करपती ! तरिहि फुलवितों गान ! ’, ‘ सण सण सुटती गोळ्या पवनीं ! निरपराध ये रक्त उसळुनी ! ’, ‘ आलीस उशीरा जीवनांत साजणी ! वरदान त्यामुळे शाप तुझें जाहलें ! ’—अशा कित्येक ओळी मनाच्या उत्कटावस्थेंत स्वतःशीं गुणगुणत असतांना कांतांची कविता कोणती आणि माझ्यांतला ‘मी’ कोणता, यातला भेद कल्पितां येत नाही. मराठवाडा या कवितेवर अशाच स्वरूपाचा आपला हक्क सांगेल, अशी माझी खात्री आहे !

● ● ●

ज्ञानेश्वरींतील एका ओवीविषयीं प्राचीन मराठीच्या दृष्टीने अधिक अर्थप्रकाश

प्रिन्सिपॉल–ह. ना. नेने, एम्. ए., एल्. टी.

● अमरावतीच्या डिप्लोमा ट्रेनिंग इन्स्टिटयूटचे प्रिन्सिपॉल हरिभाऊ नेने हे अव्वल दर्ज्याचे संशोधक, शिक्षणशास्त्रज्ञ व विद्वान् म्हणून सुप्रसिद्ध आहेत. ‘ ज्ञानेश्वरी ’ तील ‘ कातले ’ शब्दाच्या अर्थासंबंधींचा हा चर्चा–लेख हरिभाऊंच्या चिकित्सकपणाची साक्ष देणारा आहे.

या लेखास उत्तर देणाऱ्या लेखांस ‘ युगवाणींत ’ स्थान देण्यांत येईल.

★ ★ ★

हो का निजसार विजयाचें । की तें भांडार
महातेजाचें
जेथ गरुडाचिये जावळिचे । कातले चाऱ्ही ॥
ज्ञानेश्वरी १०१३८

१ गीतेंतील पहिल्या अध्यायाच्या चौदाव्या श्लोकावर श्रीज्ञानेश्वरांनी ज्या तेरा ओव्या लिहिल्या आहेत, त्यांपैकीं ही ओवी, जुन्या मराठींतील शब्दार्थाच्या दृष्टीने, प्रतिपादनासाठी घेतलेली आहे.

२ गीतेचा मूळ श्लोक व त्याचा सरलार्थ पुढीलप्रमाणे आहे. ‘ ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ । माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ पांढऱ्या घोड्यांनी युक्त (श्वेतैः हयैः युक्ते) अशा मोठ्या रथांत बसलेले (महति स्यंदने स्थितौ) श्रीकृष्ण व अर्जुन (माधवः पाण्डवः च एव) यांनीहि आपले दिव्य शंख वाजविले (दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः).

३ या मूळ श्लोकांवरील ओव्यांचा अर्थ लावतांना, ज्ञानेश्वरांची निरूपण—पद्धति लक्ष्यांत घेणें अवश्य आहे. ‘मूळ शास्त्रपदें वाखाणीन ’;

---

१ हा निबंध मध्यप्रांत संशोधक मंडळाच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक उत्सवांत (ता. २६–१–४७, रविवार रोजीं) वाचला गेला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'अक्षराअक्षरांतील, पदापदांतील दडलेला अर्थ बाहेर काढीन'; 'अर्थरसानें दाटलेलीं व सद्भावनेच्या सुगंधानें दरवळणारीं तीं पदें व शब्द यांचा आस्वाद श्रोत्यांना घेतां येईल' अशा प्रकारें ज्ञानेश्वर निरूपण करीत असतात; तेव्हा प्रस्तुत गीताश्लोकांतील मूळ पदांचा अर्थ कोणत्या प्रकारें त्यांनी विवेचिला, हें आपण पाहूं. रथाच्या वर्णनाच्या ओव्या जरी एकंदर तेरा असल्या, तरी सर्व ओव्यांशी आपणाला कर्तव्य नाही. 'श्वेतैः हयैः युक्ते (महति स्यंदने)'–या पदांचा विचार करणारी आरंभीं दिलेली ओवी आपणांस विचारांत घ्यावयाची आहे; व आज जो तिचा अर्थ केला जातो, तो मूळ पदांना धरून, प्राचीन मराठीच्या दृष्टीने आहे काय व तसा नसल्यास खरा अर्थ कोणता व त्याला पुरावा काय–इत्यादि गोष्टींचें विवेचन आपणांस पाहावयाचें आहे.

४ 'हो का निजसार विजयाचें ।
की तें भांडार महातेजाचें ।'

हें रथाचें वर्णन आहे. मूळ पद 'महति' या शब्दांतील अर्थाचा उलगडा, येथे सुरू झाला आहे. रथाचें 'मोठेपण' कोणत्या दृष्टीने, हा प्रश्न घेऊन त्याचें स्पष्टीकरण या भागांत चालू आहे व पुढील १०–१२ ओव्यांत अत्यंत काव्यपूर्ण असें वर्णन ज्ञानेश्वरांनी केलें आहे. 'जणु काय विजयाचें सारसर्वस्व, किंवा महातेजाचा भांडारखाना' – असा ओवींतील अर्धभागाचा अर्थ आहे.

'जेथ गरुडाचियें जावळिचे । कातले चार्‍ही'

या राहिलेल्या अर्ध ओवीचा अर्धभाग, रथाला जोडलेल्या घोड्यांचें वर्णन, करीत आहे. 'ज्या ठिकाणीं (ज्या रथाला) (वेगवत्तेच्या बाबतींत) गरुडाचे जुळे भाऊ शोभणारे चार घोडे जुंपले आहेत (कातले चार्‍ही)' असा या भागाचा सरलार्थ सध्या सर्व टीकाकारांकडून केलेला आढळतो. साखरे, भिडे–इत्यादि सर्वजण असाच अर्थ देतात. म्हणजे मूळ श्लोकांतील 'श्वेत' म्हणजे 'पांढरा' हा शब्द ज्ञानेश्वरांच्या टीकेंत सुटलेला दिसतो व 'कातले' हा शब्द क्रियापद म्हणून समजला जाऊन त्याचा अर्थ 'जुंपेल' अशा अर्थानें केला असावा, असें दिसतें, एवढेंच नव्हे, तर रा. भिडे यांनी तळटीपांत तो अर्थ दिला आहे. तेव्हा ज्ञानेश्वरांनी मूळपद 'श्वेत' हें गाळलें की काय व 'कातले' म्हणजे 'जुंपिले' असा अर्थ प्राचीन मराठींत करीत होते की काय, असे दोन प्रश्न उद्भवतात.

५ ज्ञानेश्वरांनी मूळ शब्द 'श्वेत' — जो घोड्याचें विशेषण आहे— तो गाळलाच असेल की नसेल, हें सांगणें कठीण आहे. कारण कांही उल्लेख असे सापडतील की, ज्यांत 'मूळपद' गाळलेलेंहि आढळेल. त्यांचे म्हणणें भावार्थानें घ्यावयास पाहिजे. अगदी अक्षराक्षरांकडे, पदापदाची कोर पाहून, आंतील गूढार्थ त्यांनी अनेक ठिकाणीं स्पष्ट केला आहे, ही गोष्ट खरी; पण प्रत्येक ठिकाणीं तसेंच केलें असेलच, असें म्हणण्याचें कारण नाही. पांढरे घोडे होते की, ते आणखी इतर रंगाचे होते, हें सांगण्यांत विशेष कांही नसल्याने 'श्वेत' शब्द सुटून गेला, तरी कांही बिघडत नाही, असा एक पक्ष संभवतो.

पण हा पक्ष पूर्ण निर्विवाद आहे, असेंहि धरून चालणें कठीण आहे. 'गरुडाला वेगामध्ये जुळे भाऊ शोभणारे' असें घोड्याचें वर्णन जेथे येते, त्या ठिकाणीं 'श्वेत' शब्द चुकून राहिला, असें वाटत नाही. तसेंच रथासंबंधीं पुढील १०-१२ ओव्या वाचल्या, तर या म्हणण्याला अधिक पुष्टि मिळते. तेव्हा जर 'श्वेत' शब्द गाळला नसेल, तर दुसर्‍या कोणत्या शब्दाने त्याचा अर्थ स्पष्ट झाला, हें दाखविल्याशिवाय वरील उपपत्तींत कांही अर्थ नाही, असें ठरतें. तेव्हा पहिल्या शंकेचा विचार-निर्णायक स्वरूपाचा असा–पूर्ण तडीस जाऊं शकत नाही.

६ आता, 'कातणें' म्हणजे 'जुंपणें' हा अर्थ तरी प्राचीन वाङ्मयांत इतरत्र उपलब्ध होतो काय, याचा विचार करूं.

'कातणें' म्हणजे 'कोरणें' (कृत्-कृन्तन्ति) या धातुपासून तयार झालेला कोरीव शब्द अनेक ठिकाणीं उपलब्ध होतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(अ) उद्धवगीता अथवा एकादशस्कंद—

तो वैराग्याचा कातिउ। कि महातपाचा वोतिव।
कि निवृत्तीचा थळिउ। वोडधला तो ॥ २५१ ॥

तो अवधूत यति, जणु काय, वैराग्यांतून कोरून तयार केलेला होता; जणु काय, महातपाचा रस साच्यांत ओतून बनविला होता, किंवा संसारनिवृत्तिरूपी पत्रावर ठसा उमटवून सिद्ध झाला होता.

(आ) नरेंद्र कविकृत रुक्मिणी स्वयंवर

हीमावतीचें आटिले हीव।
तें दळवाडें काढुनि चिरीव
दामोदर केलें कातीव।
हीमोदकाचे ॥ ४१६ ॥
कल्पतरुचिये हिंदोळा कातिवे।
भीमकी देखिली वसुदेवें
जैसी चंद्रकला वोसावे।
कृष्णपक्षालागौनी ॥ ६५१ ॥

वरील ओव्यांत कातिव म्हणजे कोरून बनविलेले असाच अर्थ होतो.

(७) 'कातले' म्हणजे 'जुंपले' या अर्थी उल्लेख पाहण्याचा प्रयत्न केला; पण ज्ञानेश्वरींत तर दुसरा उल्लेख नाहीच; पण इतरत्रहि उपलब्ध झाला नाही. कोणाला तसें उदाहरण सापडल्यास त्यांनी कळवावें, आभारी होईन. तसें उदाहरण सापडेल, असें वाटत नाही. तेव्हा 'कातले' याचा अर्थ ज्या अर्थी 'जुंपले' जमत नाही, त्या अर्थी 'रथाला जोडलेले घोडे कातिव होते, रेखीव होते,' असा अर्थ केल्यास तो समाधानकारक वाटत नाही.

(इ) ज्ञानेश्वरी, अध्याय १७, ओवी ९६.

'आपुलेया पुढिलाचेया। आंगीं घालूनि कातिका
रक्तमांसा प्रणीतया। भरभरीं ॥'

'जे आपल्या व दुसऱ्याच्या अंगांत कातिका म्हणजे कोयता घालून रक्तमांसाचे यज्ञपात्र कांठोकाठ भरतात'—असा अर्थ या ओळींत आहे. कात्रीने कातरलेल्या तुकड्यांना 'कातर, चकत्या' वगैरे शब्द लावतात. 'कोन्त' म्हणजे 'भाल्यासारखें शस्त्र' असाहि शब्द जुन्या मराठींत येतो. 'कातेकार', भालेवाले, असा शब्द पुढील ओव्यांत दिसून येतो.

शिशुपालवध—कवीश्वर भास्करकृत

'ऐसे धनु रे धनु म्हणत। पातले जादवांचे राउत।
मारि रे मारिजैल पळत। कातेकारू हे ॥ ९६० ॥
तें देखौनि राउताळें। पुढील कातेकारू मुरडैले।
थीरू रे थीरू म्हणत वाइलें। पारकां विदुरथाचां
॥ ९६१ ॥

सारांश, कृत्–कृन्तति म्हणजे काप काढणें, बारीक तुकडे करणें, या धातूशी वरील अर्थ जुळतो. 'जुंपणें किंवा जोडणें' या अर्थी अर्थ जमत नाही.

९ आता, आणखी निराळ्या प्रकारें याचा विचार करणें शक्य आहे. 'जुंपणें,' 'जोडणें' या अर्थी जुन्या मराठींत कोणते शब्द वापरले जातात, या दृष्टीने कांही उल्लेखांचा विचार करूं.

(अ) एक महानुभावीय गीता (सुमारें १५–१६ वें शतक):—

'तया नंतर येराकडे।
महारथीं जुंतले होते श्वेत घोडे।
तयावरि माधव पांडव संवगडे।
महादिव्य ॥'

येथे युक्त या अर्थी 'जुंतले' असें रूप योजिलें आहे.

(आ) एकनाथ रुक्मिणीस्वयंवर (शके १४९३), अध्याय १२, ओवी १६:—

सैन्य पालाणा रे पालाणा।
घाव घाला रे निशाणा।
रथ संजोगोनि आणा।
रणांगणा जाऊं वेगीं ॥

वरील उदाहरणांवरून 'युज्–युञ्ज्' 'जोडणें' या धातूशी संबंध असलेले शब्द 'जुंपणें, जोडणें' याअर्थी वापरले जात होते, असें दिसतें. 'युक्ति, युगत, जुगत, संयोग, संयोजित, संयुक्त'— यांत 'य्' च्या जागीं 'ज्' येणें व अन्त्य 'ज्' चा 'ग्' होणें, हे भाषाशास्त्राच्या नियमाला धरून आहे.

'श्वेतैः हयैः युक्ते महति स्यन्दने' या ठिकाणीं 'युज्' धातूशीं संबंध असल्याने व एका टीका-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कारानें प्रत्यक्ष ‘ युक्त ’ च्या जागीं ‘ जुंतले ’ शब्द वापरल्याचें आढळून आल्याने येथे ‘ कातले ’ शब्दाच्या जागीं ‘ जुंतले ’ असा दुसरा पाठ कोणी सुचविण्याचा संभव आहे, इतका हा शब्द मूळ शब्दांना अनुसरून जुळतो.

पण ज्ञानेश्वरीच्या कोणत्याहि प्रतींत असा पाठ नसल्याने हा पाठ स्वीकारणें शक्य नाही. एखाद्या महत्त्वाच्या प्रतींत तसा पाठ असता, तर तो स्वीकारला असता; कारण ‘ कातले चान्ही ’ याच्या जागीं ‘ जुंतले चान्ही ’ हे शब्द अगदी नीट बसतात. पण आधारावाचून नुसती उपपत्ति, ही सिद्धान्त होऊं शकत नाही. तेव्हा आपली शंका अजूनहि दूर झाली नाही. ‘ श्वेत ’ शब्द गाळला की नाही, हें कळत नाही व ‘ कातले ’ म्हणजे ‘ जुंपले ’ हें जमत नाही. तेव्हा ‘ कातले ’ याचा दुसरा कांही अर्थ असू शकतो काय की, ज्याच्यामुळे आपल्या शंकांचें समाधान होईल.

१२ आणखी एक उपाय अजून राहिला आहे. जुन्या मराठींत जेथे ‘ घोड्याचीं ’ वर्णनें आलीं असतील, ते उल्लेख तोलून पाहणें हा तो मार्ग होय. पुढील स्थळें पाहा:—

(अ) शिशुपाल वध–भास्कर कविकृत, छापील प्रत, पान ८३—

शिशुपाळा बरोबर सामना करण्याच्या उद्देशाने श्रीकृष्ण घोड्यावर स्वार निघत असतां त्याच्या घोड्याचें वर्णन पुढीलप्रमाणें कवि करीत आहे—

तो वानितां वारू । निन्हा न करी विस्तारू
साउमा असिका वीरू । म्हणावा असे ॥९९०॥
तोजियाचोनि[1] दळभिडे[1] । गरुड नव्हे तेणें पाडें ।
तो पौवाळिताए[2] वेगाडें । मनोहरां गतीं॥९९१॥
गरुड होए चालना[3] । फुन[4] रूपें रेखां उणा ।
वरि वागेचिया खुणा[5] । कांहीं नेणे ॥९९२॥
मन होए वेगाडें । फुण तें अणु एव्हडे
भणउनि उपमा न घडे । तेआ वारुआंसि॥९९३॥

---

१ घोड्यांचा समूह. २ उसळत आहे. ३ वेगवान्. चपळ, ४ पण. ५ लगामाची इशारत, सूचना.

तो कैसा दिसताहे कातळा । जैसा अमृतरसाचा ओतिला ।
की[1] स्रष्टेनि धडा[2] घातला[2] । रेवांतासि[3] ॥९९४॥
तो कापुरें उटिला[4] । की चांदणेनि घुमळिला[5] ।
की पाखरा[6] गवासिला[6] । मौक्तिकाचिया[6]॥९९५॥
झळाळितेयां सूर्यमंडळा । वरि सावळा मेघ ढमढला ।
तैसा मुरारि मिरविला । कातळे यावरि ॥९९६॥

वरील उताऱ्यांत ‘ कातळा ’ ‘ कातळिया ’ यांचा घोड्याच्या कडे निःसंशय संबंध आहे रेवांतक घोडा, मन, गरुड इत्यादि वेगवान वस्तूंशीं तुलना करून त्या उपमेला कमी पडतात, असें कवीने चातुर्याने दर्शविलें आहे. या घोड्याला आपल्या मालकाचें हृद्गत लगामाच्या सूचनेवरून जसें कळत आहे, तसें गरुडाला जमत नाहीं; मन वेगाडे असेल, पण अगदीच अणू एवढें. रेवांतक घोडा पासंगालाहि पुरणार नाही. पण नंतरच्या उपमांवरून तर हा घोडा ‘ कातळ ’ म्हणजे ‘ पांढरा ’ असावा, असें निश्चित वाटतें. कापराची उटी, चांदणें, सूर्यमंडळ. हे ‘ पांढरे, चकाकणारे ’ पदार्थ आहेत; त्या वस्तू घेऊन. जणु काय, हा घोडा घडविला आहे, असें कवि वर्णन करीत आहे. त्याला मोत्याची झूल अगून सूर्यमंडळावर आरूढ होणारा श्यामल मेघ जसा शोभायमान दिसतो, तसा पांढऱ्या चकाकणाऱ्या घोड्यावर श्रीकृष्णाची सावळी मूर्ति मिरवत आहे, असें मोठ्या कुशलतेने कवि वर्णन करीत आहे.

यावरून ×कातळे म्हणजे ‘ चकाकणारा, पांढरा ’ असा अर्थ दिसतो.

(आ) दुसरें उदाहरण:— (शिशुपाळवध, पान ७८, ओवी ९३४–९३६)

---

१ ब्रम्हदेवाने. २ ताजव्यांत दुसऱ्या बाजूला घातलेली वस्तु. ३ एका घोड्याचें नांव (स्वर्गीद) ४ कापराची उटी दिली. ५ बुचकळून काढला. ६ मोत्याच्या झुलीने आच्छादिला.

× ‘ कम् कान्त–चकचकित ’ या धातूशी संबंध असावा, असें प्रि. पांढरीपांडे सुचवितात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वारेआ[1] पासौनि वेगाडे ।
पर्वता होनि[2] दळवाडे ।
ते वारू उंचवडे ।
काई वाणौ ॥९३४॥

× × ×

उच्चश्रवाचियें जावळिचे ।
कातळे सांब्रायणीचे[3] ।
पंचकल्याण कल्हारींचे ।
राजवाहक ॥९३६॥

वरील ओव्यांत राजवाहन घोड्यांच्या वर्णनावरून निरनिराळ्या रंगांचे घोडे वर्णिले जात आहेत, हें स्पष्ट आहे; म्हणून 'कातळ' शब्द रंगवाचकच आहे.

१३ 'कातळ' म्हणजे 'पांढरा' हा अर्थ आपल्या दोन्ही शंकांचें एकाच वेळीं निवारण करणारा ठरतो. फक्त येथे 'ल–ळ' हे समसमान धरावे लागतात; या गोष्टीला भाषाशास्त्र विरुद्ध जात नाही. तेव्हा 'श्वेतैः हयैः युक्ते महति स्यन्दने' यांच्या जागीं मराठीमध्ये 'गरुडाचिये जावळिचे' कातले चाऱ्ही' हे शब्द असून त्यांचा अर्थ पुढील प्रमाणे आहे:—

'ज्या रथाला पांढरे. चकाकणारे, पांढरे शुभ्र, असे चार घोडे (आहेत).' 'जेथ' शब्द योजल्यामुळे 'युक्त शब्द सोडला गेला. 'ज्या रथाच्या ठिकाणीं श्वेत घोडे आहेत,' असें म्हटल्याने 'युक्त' शब्दाची अडचण भासत नाही. आणि, केलेल्या अर्थाला जुन्या मराठी काव्यांतील उल्लेखांचा भरपूर पुरावा आहे. जुन्या मराठीच्या अर्थाच्या वापराकडे पाहून जे जे आक्षेप आले ते सर्व नाहीसे झाल्याने श्वेत या जागीं 'कातळ' हा शब्द आहे, असें सिद्ध होते. महानुभावाच्या टीपग्रंथांत 'शिशुपालवध' यावरील टीपेंत तो अर्थ दिला आहे, असें वाटतें. पण आज ती पोथी माझ्याजवळ नाही.

सारांश, जुन्या मराठीच्या तुलनात्मक अभ्यासाला महानुभावीय वाङ्मय कसें पोषक आहे हें यावरून श्रोत्यांच्या प्रत्ययाला येईल.

१ वाऱ्याहून अधिक. २ पर्वताहून–पेक्षा. ३ एक प्रकारचें द्वीप.

• • •

संस्कृतसाहित्यशास्त्रांतील औचित्यविचार

प्रा. गणेश त्र्यंबक देशपांडे, एम्.ए.,एल्.एल्.बी.

● अमरावतीच्या श्रीशिवाजी कॉलेजांतील संस्कृतचे प्रा. ग.त्र्यं. देशपांडे यांचा साहित्यशास्त्राचा गाढ व्यासंग आहे. या लेखांत त्यांनी औचित्याचा साधार विचार केलेला आहे.

★ ★ ★

कण्ठे मेखलया, नितम्बफलके तारेण हारेण वा
पाणौ नूपुरबन्धनेन, चरणे केयूरपाशेन वा ।
शौर्येण प्रणते, रिपौ करुणया, नायान्ति के हास्यताम्
औचित्येन विना रतिं प्रतनुते नालङ्कृतिर्नो गुणाः॥

क्षेमेन्द्राच्या 'औचित्यविचारचर्चे'तील हा श्लोक साहित्यांत औचित्याचें महत्त्व निदर्शित करतो. साहित्यांतील रस, ध्वनि–वगैरे अंगांबद्दल अनेकदा विवेचन झालें आहे आणि अजूनहि प्रत्यहीं होत आहे. औचित्याचें विवेचन अधिकाधिक होणें हेंहि औचित्यास धरूनच आहे!

या विषयाचें तात्त्विक विवेचन क्षेमेन्द्राने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या ग्रंथांत केलें आहे. पण त्याच्याहि पूर्वी औचित्यविचार 'ध्वन्यालोकां' त सापडतो. ऐतिहासिक दृष्टीने औचित्यविचाराकडे पाहिल्यास तो बराच प्राचीन आहे, असें दिसून येईल. रस आणि औचित्य यांचा अत्यंत निकट संबंध आहे; आणि रसतत्त्वाचा इतिहास जितका जुना असेल, तितकाच औचित्यविचारहि प्राचीन असूं शकतो.

औचित्याचा रसाशी आणि साहित्याच्या इतर अंगांशी कशा प्रकारचा संबंध आहे, हें क्षेमेन्द्राच्या पुढील कारिकांवरून दिसून येईल—

औचित्यस्य चमत्कारकारिणश्चारुचर्वणे ।
रसजीवितभूतस्य विचारं कुरुतेऽधुना ॥
काव्यस्यालमलङ्कारैः किं मिथ्यागणितैर्गुणैः ।
यस्य जीवितमौचित्यं विचिन्त्यापि न दृश्यते ॥
अलङ्कारास्त्वलङ्कारा गुणा एव गुणाः सदा ।
औचित्यं रससिद्धस्य स्थिरं काव्यस्य जीवितम् ॥
उचितस्थानविन्यासादलङ्कृतिरलङ्कृतिः ।
औचित्यादच्युता नित्यं भवन्त्येव गुणा गुणाः ॥
(औ. वि. च. ३-६)

औचित्य हें 'रसजीवितभूत' आहे. ज्यामध्ये विचार करूनहि औचित्य दिसत नाही, अशा काव्यांत अलंकार किंवा गुण यांचा कांहींच उपयोग नाही. अलंकाराची किंमत ही अलंकाराइतकीच आणि गुण हे गुणच राहणार, पण औचित्य हें रससिद्ध काव्याचें जीवित आहे. अलंकारांना अलंकारत्व त्यांचा उचित स्थानीं विन्यास केल्याने असतें आणि गुण हे औचित्यापासून च्युत झालेले नसले, तरच गुण ठरतात. अस्थानीं वापरलेल्या अलंकारांमुळे आणि दाखविलेल्या गुणांमुळे कशी हास्यास्पद स्थिति होते, हें क्षेमेन्द्राने आरंभीं उध्दृत केलेल्या कवितेंत दाखविलें आहे.

औचित्य हें रसजीवितभूत असल्याने रससिद्ध काव्याचें जीवित आहे. गुणांना आणि अलंकारांनाहि औचित्यामुळे किंमत येते. रस आणि औचित्य यांचा असा अन्योन्य संबंध सांगितल्यावर क्षेमेन्द्र औचित्याचें स्वरूप पुढील कारिकेंत सांगतो—

उचितं प्राहुराचार्याः सदृशं किल यस्य यत् ।
उचितस्य च यो भावस्तदौचित्यं प्रचक्षते ॥७॥

योग्य, अनुरूप अशी गोष्ट म्हणजे उचित गोष्ट; आणि ती तशी असणें म्हणजे औचित्य. काव्यांत पाहिजे तशी गोष्ट असली, म्हणजे रसाभिव्यक्ति होते आणि ती तशी नसली, म्हणजे रसभंग होतो. म्हणूनच 'ध्वनिकार' म्हणतो, अनौचित्याखेरीज रसभंगाचें दुसरें कोणतेंहि कारण नाही. प्रसिद्ध अशा औचित्याने युक्त काव्यबंध निर्माण करणें हेंच रसाचें उपनिषद् म्हणजे रहस्य आहे." × औचित्याची खरी किंमत तें नसलें म्हणजे कळतें. औचित्य नसलें की, रसभंग झालाच. म्हणून क्षेमेन्द्राने त्याला 'रसजीवितभूत' म्हटलें आहे.

औचित्याची थोडक्यांत खालीलप्रमाणे कल्पना मांडतां येईल. रस हा काव्याचा आत्मा आहे; गुण हे त्याचे धर्म आहेत आणि अलंकार हे त्याला शोभा देणारे आहेत. गुण आणि गुणी, धर्म आणि धर्मी, अलंकार आणि अलंकार्य यांच्यामध्ये परस्पर संवादित्व आणि संप्रतिपत्ति असणें हें औचित्य होय. रसाच्या अपेक्षेने गुणालंकारांचा उचित विन्यास म्हणजे औचित्य. औचित्य हा सत्काव्याचा सहज स्वभाव आहे. आणि, कवीच्या काव्यांत हें औचित्य साधणें म्हणजेच 'काव्यपाक' होय.* हा काव्यपाक म्हणजेच शब्दकलेंतील सौंदर्य आणि पूर्णता. ज्यामुळे काव्यांतील सौंदर्यांत न्यूनता येईल, तें सर्व अनौचित्यमूलक होय. हें औचित्य एका दृष्टीने साहित्यांतील सौंदर्य, संवादित्व आणि पूर्णता या रूपाने व्यक्त होतें; तर दुसऱ्या दृष्टीने निरनिराळ्या काव्यांगांतील संगति आणि संयोजन या रूपाने व्यक्त होतें. काव्यांगांचा विचार करतांना पद, अर्थ, गुण, अलंकार, प्रबंध आणि रस असा अनेक तऱ्हांनी विचार होऊं शकतो; आणि हा विचार साकल्याने रससापेक्ष असूं शकतो. म्हणजेच पदौचित्य, अर्थौचित्य,

× अनौचित्यादृते नान्यत् रसभङ्गस्य कारणम् ।
प्रसिद्धौचित्यबन्धस्तु रसस्योपनिषद् परा ॥
ध्व. लो. ३, १५

* रसोचितशब्दार्थसूक्तिनिबन्धनः पाकः ।
राजशेखर—'का. मी.' पान २०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुणौचित्य असे औचित्याचे अनेक प्रकार होतील. औचित्याचे हें अनेक प्रकार पुन: साकल्याने विचारांत घेतां रसाच्या अपेक्षेने पाहिले जातील. हेंच रसौचित्य होय. भरतानेहि नाट्यरसाच्या दृष्टीने निरनिराळ्या नाट्यांगांचा 'रसप्रयोग' सांगितला आहे. नाट्यांतील रसप्रयोग तेंच काव्यांतील रसौचित्य.

ज्याअर्थी रसाचा प्रत्येक काव्यांगाशी संबंध येत आहे, त्याअर्थी औचित्याचाहि प्रत्येक अंगाशी संबंध आहे. या काव्यांगांत जर औचित्य नसलें, तर काव्यदोष संभवतात. कारण कोणतीहि गोष्ट औचित्ययुक्त नसली, तर काव्यांत रसभंग होणार. आणि, रसभंग करणारी कोणतीहि गोष्ट म्हणजे दोष झालाच. काव्यांतील एकमेव दोष अनौचित्य असून शास्त्रग्रंथांतील दोषप्रकरण म्हणजे अनौचित्यविवेचनच होय. औचित्यविवेकानेच दोषांचा नित्यानित्य विभाग संभवू शकतो.

क्षेमेन्द्राने देश, काल इत्यादिकांच्या औचित्याचेंहि विवेचन केलें आहे. अर्थदृष्टीने या गोष्टींचा काव्याशी संबंध येतो. काव्यवस्तूचें वर्णन करीत असतांना देश, काल–इत्यादिकांचेंहि औचित्य साधावें लागतें. या सर्व गोष्टींचें औचित्य हें कवींच्या लोकनिरीक्षणावर अवलंबून असतें. लोक, शास्त्र, काव्य–इत्यादिकांचें अवेक्षण करणें हें काव्यकरणाचें प्रधान अंग मानलें आहे. प्रतिभा, व्युत्पत्ति आणि अभ्यास हीं समवाय वृत्तीने काव्यकरण आहेत. त्यांपैकी व्युत्पत्तिलाच राजशेखराने 'उचितानुचितविवेक' म्हटलें आहे.* औचित्याचा प्रांत हा गुणालंकारादिकांपुरताच नसून काव्यवस्तूलाहि तो व्यापणारा आहे, असें यावरून दिसेल.

काव्यवस्तु आणि काव्यस्वरूप यांच्याप्रमाणे प्रबंधाचेंहि औचित्य असलें पाहिजे. काव्यबंधांतील वेगवेगळे प्रसंग आपापल्यापुरतेच उचित असून चालत नाहीत, तर सर्व प्रबंधहि एक काव्यवस्तु आहे, या दृष्टीने त्या सर्वच प्रसंगांत औचित्य असलें पाहिजे. हें प्रबंधौचित्य राखण्याचें कार्य पुष्कळ कवींना साधत नाही. प्रबंधौचित्य साधनालाच 'अनुसंधि' म्हणतात; आणि अनुसंधि हेंच सहृदयतेचें लक्षण आहे.* भोजाने यालाच 'सन्निवेशप्राशस्त्य' म्हटलें असून तो एक 'प्रबंधालंकार' आहे, असें त्याने 'शृंगारप्रकाशां'त सांगितलें आहे. काव्यबंधामध्ये नगरें, समुद्र, चंद्रोदय–वगैरे अनेक वस्तूंचीं वर्णनें येतात. त्यांचें काव्यवस्तूच्या व रसाच्या दृष्टीने औचित्य असलें पाहिजे. या औचित्याचें थोडक्यांत स्वरूप भोजाने तेथेच यशोवर्म्याचा एक श्लोक उध्दृत करून दाखविलें आहे.×

प्रबंधौचित्यहानीचीं उदाहरणें म्हणून संस्कृतांतील कांही महाकाव्यें दाखवितां येतील. विशेषत: महाकाव्याचें लक्षण हें शास्त्रग्रंथनिविष्ट झाल्यानंतर जीं महाकाव्यें उदयास आलीं, त्यांत तर प्रबंधाचें अनौचित्य विशेषच पाहावयास मिळतें मुख्य काव्यवस्तूशी संबंध असो वा नसो, त्याने रसाची अभिव्यक्ति होवो वा अपकर्ष होवो, कशाचीहि पर्वा न करतां त्यांनी आपल्या काव्यकृतींत भराभर वर्णनें घुसडून दिलीं. महाकाव्यांत सायंकाळचें वर्णन पाहिजे, घ्या सायंकाळचें वर्णन; रतिक्रीडावर्णन पाहिजे, हें घ्या रतिक्रीडावर्णन; पानगोष्ठी पाहिजेत, हा पाहा पानप्रकार; जलक्रीडा पाहिजे, ही घ्या जलक्रीडा;–अशा एक ना अनेक गोष्टी त्यांनी काव्यांत घातल्या ! इतकेंच नव्हे, तर यमक, अनुलोमप्रकार, चित्रबंध–वगैरे सर्वच प्रकार त्यांनी महाकाव्यांत घातले. हीं चंद्रोदयाचीं आणि इतर वर्णनें आपापल्या दृष्टींनी अगदी

---

* "उचितानुचितविवेको व्युत्पत्ति:" इति यायावरीय: । का. मी. पान १६

*अनुसन्धिर्हि सर्वस्वं सहृदयताया:—हेमचन्द्र.

×तेष्वेव नगरवर्णनादीनां सन्निवेशप्राशस्त्यमलङ्कार: तदुक्तम्

औचित्यं वचसां प्रकृत्यनुगतं,
सर्वत्र पात्रोचिता
पुष्टि: स्वावसरे रसस्य च, कथामार्गे न चातिक्रम: ।
शुद्धि: प्रस्तुतसंविधानकविधौ, प्रौढिश्च-
शब्दार्थयो :
विद्वद्भि: परिभाव्यतामवहितै:, एतावदेवास्तु न: ॥

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चांगलीं असलीं, तरी मुख्य काव्यवस्तूशीं आणि प्रबंधरसाशी त्यांचा संबंध नसल्यामुळे तीं केवळ बांडगुळासारखीं त्यांवर चढलेलीं आहेत व रस-हानीला कारणीभूत झालीं आहेत. भट्ट लोल्लटानें अशा सर्व रसविरोधी प्रकारांचें कारण एक तर 'अभिमान' किंवा 'गड्डुरिकाप्रवाह' म्हणजे 'आंधळ्यांची माळ' आहे, असें सांगून त्यावर खरपूस टीका केली आहे. *

काव्यांतील रसविषयक औचित्याचें महत्त्व काय आहे, हें रसदोष प्रकरणाकडे नजर टाक-ल्यास दिसेल. विभावादिकांची प्रतीति कष्टानें होणें, प्रतिकूल विभावांचें ग्रहण, अकाण्ड-विच्छेद, अकांडप्रथन, रसांची पुनर्दीप्ति हे सर्व रसाच्या अनौचित्याचे प्रकार होत.

औचित्याच्या स्वरूपाचें वर जें दिग्दर्शन केलें आहे, त्यावरून साहित्यांत औचित्यांचें किती महत्त्व आहे, हें दिसून येईल. काव्याचें बरें-वाईट-पण हें औचित्यावर अवलंबून असतें. काव्यांत गुण असतील, अलंकार असतील, पण ते रसानुकूल नसतील तर, केवळ ते हास्यास्पद ठरतात ! जो रसभावनावान् कवि आहे, तो, ते गुण आहेत एवढ्याच कारणानें, त्यांचा उपयोग करीत नाहीं. काव्य लहान असो वा मोठें असो, अथपासून इतिपर्यंत तें एक काव्यवस्तु असतें व एक काव्यवस्तु म्हणूनच त्याचें परीक्षण करावयाचें असतें. काव्यामधील कोणत्याहि एका काव्यांगाला स्वतंत्र स्थान नसल्यानें त्याचें रमणीयत्व साकल्यानें पाहावयाचें असतें. म्हणूनच अंगांच्या दृष्टीनें औचित्य हें संगति व संयोजन स्वरूपाचें असतें, तर साकल्यानें तें संवादस्वरूप आणि पूर्णतेनें युक्त असतें.

हें झालें श्रव्यकाव्यासंबंधी. दृश्यकाव्यांत तर औचित्याचा प्रांत याहूनहि व्यापक आहे. कवीनें नाटक कसें लिहिलें आहे, हेंच पाहून चालत नाहीं, तर तें रंगभूमीवर कसें दिसतें, हेंहि पाहावें लागतें. नटांच्या वेषभूषेपासून तों हावभावा-पर्यंत सर्वच रसानुकूल असलें पाहिजे. भरताची—

एतद्विभूषणं नार्या आकेशादानखादपि ।
यथाभावरसावस्थं विज्ञायैवं प्रयोजयेत् ॥
ना. शा. २३-४२

तसेंच,

अदेशजो हि वेषस्तु न शोभां जनयिष्यति ।
मेखलोरसि बन्धे च हास्यायैवोपजायते ॥
ना. शा. २३-६९

इत्यादि वचनें पाहिलीं, म्हणजे भरताला औचित्याचें महत्त्व कितो वाटत होतें, हें कळेल. प्रत्येक अभिनयांगाच्या शेवटी भरतानें वर्णिलेला 'रसप्रयोग' म्हणजेच साहित्यशास्त्रांतील 'औचित्य' होय. नाट्यशास्त्रांत औचित्य-विचार केलेला नसला, तरीहि तो सूचित झालेला आहे, हें निश्चित.

नाट्यांमधील रसतत्त्व हें श्रव्यकाव्याच्या विवे-चनांत आल्याबरोबर रसाच्या अपेक्षेनें गुण, रीति, अलंकार यांचें पुर्नविवेचन होऊन त्यांची नवीन व्यवस्था झाली; आणि या नवीन व्यवस्थेंतच सर्वांचें औचित्य साधलें गेलें. अर्थाचें म्हणजे वर्णित प्रसंगांचें आणि विभावादिकांचें औचित्य 'लोकप्रामाण्या'वरून ठरलें आणि भावादिकांचें औचित्य 'चर्वणात्मकतेवर' अधिष्ठित झाल्या-बरोबर शब्दापासून तों रसापर्यंत सर्वच काव्यां-गांची उपपत्ति लागली. शब्दांचें सूचकत्व, अर्थाचें व्यंजकत्व आणि रसभावांचें आस्वाद्यत्व या सर्वांचा विवेक आणि व्यवस्था होऊन काव्यां-तील रसतत्त्वाचें पूर्ण विवेचन झालें. आनंद-वर्धनानें काव्यविवेचन व्यंग्य आणि व्यंजक-मुखानें केलेलें पाहून असें म्हणावेंसें वाटतें कीं, व्यंग्यमुखानें रस, आणि व्यंजक मुखानें

---

*मज्जन पुष्पावचयन संध्या चंद्रोदयादि वाक्य मिह ।
सरसमपि नातिबहुलं प्रकृतरसानन्वितं रचयेत् ॥
यस्तु सरिदद्रिसागर पुरतुरगरथादिवर्णने यत्न: ।
कविशक्तिख्यातिफल: विततधियां नो मत: स इह ॥
यमकानुलोमतदितरचक्रादिभिदोऽति रसविरोधिन्य:
अभिमानमात्रमेतत् गड्डुरिकादिप्रवाहो वा ॥

यांपैकी पहिले दोन श्लोक राजशेखरानें 'आपराजितीचे' म्हणून व रुद्रटानें दुसरा व तिसरा 'लोल्लटाचे' म्हणून दिले आहेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

औचित्य या दोन स्तंभांवरच त्याने सर्व ध्वनि-मंदिर उभारलें आहे.

'ध्वन्यालोका' च्या तृतीयोद्योतांत व्यंजक-मुखाने ध्वनिविवेचन केलें आहे. त्या विवेचनांत वर्ण, पदें, वाक्य, संघटना-इत्यादिकांच्या ठिकाणीं रसव्यंजकता कशी असते, हें विशद करतांना 'ध्वनिकार' म्हणतो, "या सर्वांचें नियमन करणारा हेतु म्हणजे वक्ता आणि वाच्य यांचें औचित्य होय. तसेंच, विषयौचित्यावरूनहि संघटनेची योजना होते. विशेष काव्यप्रकाराच्या आश्रयावरच संघटनेचेंहि वैशिष्ट्य ठरतें. इतकेंच नव्हे, तर संघटनेचें नियामक असें जें औचित्य सांगितलें आहे, तें केवळ पद्यांतच नव्हे, तर गद्यांतहि पाहावें लागतें. पद्यबंधाप्रमाणेच गद्यबंधांतहि रसाच्या अपेक्षेने औचित्याचा आश्रय करून रचना योजावयाची असते."*

रसध्वनि हा प्रबंधांतून कसा व्यक्त होतो, हें ध्वनिकाराने तृतीय उद्योताच्या १०-१४ या कारिकांत सांगितलें आहे. आनंदवर्धनाची त्यावरील वृत्ति म्हणजे रसदृष्टीने विभावादिकांचें औचित्यविवेचनच होय. त्या विवेचनांत तो म्हणतो, "सौष्ठवयुक्त काव्येंसुद्धा कित्येकदां नीरसच ठरतात, त्याचें कारण अनौचित्य हेंच एक होय." यानंतर आनंदवर्धनाने रसांचें आणि वृत्यादिकांचें औचित्य विवेचित केलें आहे.

'ध्वन्यालोकां' तील औचित्यविचार हा मुळांतूनच वाचून पाहणें चांगलें आहे. व्यंजक-मुखाने ध्वनिप्रतिपादन करतांना निरनिराळ्या काव्यांगांचा व्यंजकतेच्या दृष्टीने कसा संबंध येतो, हें सूचित करण्यापुरतेंच वर कांही मुद्दे दिले आहेत. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, व्यंजकमुखाने ध्वनीचें विवेचन म्हणजेच औचित्याच्या दृष्टीने रसविवेचन. रसोचित शब्दरचना म्हणजेच रसव्यंजक शब्दरचना. रसव्यंजक अर्थ असणें म्हणजेच अर्थामध्ये व्यंजकता असणें व तेंच अर्थाचें औचित्य. विभावादिकांचें रसव्यंजकत्व, म्हणजेच देशकालादिकांचें औचित्य. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काव्यांगांच्या ठिकाणीं रस-व्यंजकता असणें म्हणजेच त्या रसाच्या अपेक्षेने त्यांच्या ठिकाणीं औचित्य असणें. म्हणूनच 'ध्वनिकार' म्हणतो—

वाच्यानां वाचकानां च यदौचित्येन योजनम्।
रसादिविषयेणैतत् कर्म मुख्यं महाकवेः॥

आणि, आनंदवर्धनाच्या मताने भरताला देखील कैशिक्यादि वृत्तींसंबंधी हें औचित्यच सांगावयाचें आहे. आनंदवर्धन म्हणतो—

"रसानुगुण औचित्यवान् वाच्याश्रयो यो व्यवहारः ता एताः कैशिक्याद्याः वृत्तयः।"×

आता, प्रश्न उद्भवतो, तो म्हणजे उचितानुचितविवेक कसा करावयाचा? याचें थोडक्यांत उत्तर म्हणजे ज्यामुळे काव्यांत रसभंग होतो, तें अनुचित. महिमभट्टाने "एतस्य (अनौचित्यस्य) विवक्षितरसादिप्रतीतिविघ्नविधायित्वं नाम सामान्य-लक्षणम्" —असें अनौचित्याचें सामान्य लक्षण सांगितलें आहे व हें अनौचित्य म्हणजेच दोष होत, असें त्याने म्हटलें आहे. अनौचित्य हें दोन प्रकारचें आहे. एक अंतरंग आणि दुसरें बहिरंग. विभावानुभावादिकांचा रसाच्या ठायीं अयोग्य विनियोग हें आंतरंगिक अनौचित्य होय. बहिरंगाचें अनौचित्य हें विधेयाविमर्शादि दोष-रूपाने अनेक प्रकारचें संभवतें. श्रुतिकटुत्वादिक शब्ददोषसुद्धा अनौचित्याचेच प्रकार होत. कारण ते सुद्धा अनुप्रासादिकाप्रमाणे रसानुगुणच असतात. *

अनौचित्याचा आंतरंगिक प्रकार जो 'विभावादिकांचें अयथायथत्व' म्हणून सांगितला, त्याचा निर्णय लोकप्रामाण्यांतून होतो. काव्य असो की नाटक असो, त्याच्या ठिकाणीं 'लोक-धर्मित्व' असलेंच पाहिजे. श्रव्य काव्यांतून मनश्चक्षूला प्रतीत होणारे किंवा नाट्याच्या वेळीं

---

* 'ध्वन्यालोक,' तृतीयोद्योत कारिका ६-९

× 'ध्वन्यालोक', तृतीयोद्योत कारिका ३४ व तीवरील वृत्ति पाहा.

* याचें विशेषविवेचन महिमभट्टाच्या "व्यक्तिविवेकांत" पाहावें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रंगभूमीवर प्रत्यक्ष दिसणारे विभावादिक 'लोक-प्रमाण' नसतील, तर 'लोकविरुद्धत्व' हा दोष उत्पन्न होतो. नाट्याचें लोकप्रमाणत्व हें भरतानेच सांगितलें आहे--

लोकसिद्धं भवेन्नाट्यं सिद्धं लोकस्वभावजम् ।
तस्मान्नाट्यप्रयोगे तु प्रमाणं लोक इष्यते ॥

नाट्यांतील सर्व धर्म, शिल्प, शास्त्र आणि क्रिया या 'लोकधर्म-प्रवृत्त' असतात; व खरें नाट्य लोकधर्मित्वांतच असतें. त्याचा निर्णय केवळ शास्त्राने होत नाही—

न हि शक्यं हि लोकस्य स्थावरस्य चरस्य च ।
शास्त्रेण निर्णयं कर्तुं भावचेष्टाविधिं प्रति ॥
नानाशीलाः प्रकृतयो शीले नाट्यं प्रतिष्ठितम् ।
तस्माल्लोकः प्रमाणं हि कर्तव्यं नाट्ययोक्तृभिः ॥

औचित्याचें स्थूल वर्णन संपलें. या विषयाचा स्वतंत्रपणें विचार क्षेमेंद्रानेच केला असला, तरी औचित्याची परंपरा फार जुनी आहे. त्याचा इतिहास फार उद्बोधक व मनोरंजक असला, तरीहि तो येथे संपूर्ण देतां येत नाही; केवळ दिग्दर्शन करतां येते.

औचित्याची कल्पना भरताने नाट्यशास्त्रांत स्पष्टपणें मांडली नसली, तरी ती त्याने गृहीत धरली आहे, हें स्पष्ट दिसतें. भामह आणि दण्डी हेहि औचित्याचा स्पष्ट उल्लेख करीत नाहीत, पण त्यांचे दोषविवेचन औचित्यावरच आधारलें आहे. 'सन्निवेशविशेषात्तु दुरुक्तमपि शोभते" ही भामहोक्ति, किंवा दण्डीने विवेचिलेलें 'प्रसंगविशेषीं दोषांचें गुणत्व' यांत औचित्यच अभिप्रेत आहे, हें स्पष्ट दिसतें. औचित्याचा स्पष्ट उल्लेख यशोवर्म्याच्या, मागे उध्दृत केलेल्या श्लोकांत दिसतो.

लोल्लट आणि रुद्रट यांनी औचित्याचें विवेचन सुरू केलें आहे, असें दिसतें—ध्वनिकार आणि आनंदवर्धन यांनी केलेला औचित्याचा निर्देश मागे आलेलाच आहे. कुन्तकाने तर औचित्य हा काव्याचा आवश्यक गुण मानला असून ठिकठिकाणीं औचित्याचें महत्त्व वर्णिलें आहे. महिमभट्टानेहि उचितानुचितविवेक केलेला आहेच. आणि, क्षेमेंद्राने तर औचित्यविचार-चर्चा लिहून त्याचें स्वरूप स्वतंत्रपणें स्पष्ट केलें आहे.

औचित्यविचार हा रस आणि ध्वनितत्त्वाचा पूरक विचार आहे. क्षेमेंद्रानेहि रसाचा पूरक या दृष्टीनेच त्याचें विवेचन केलें आहे. रस हा काव्याचा आत्मा आहे व रसाच्या अभिव्यक्तीच्या विवेचनांत औचित्यविचाराचें स्थान आहे. आणि, अशा दृष्टीनेच त्याने औचित्याला 'रसजीवित' म्हटलें आहे. क्षेमेंद्र औचित्याला काव्याचा आत्मा मानतो, असें कित्येक विद्वान् समजतात, तें बरोबर नाही. रसाच्या अपेक्षेने गुणालंकारादिकांची व्यवस्था हाच त्याच्या औचित्य-चर्चेचा उद्देश आहे, हें त्याच्या सुरुवातीच्या कारिका वाचल्या असतांनासुद्धा स्पष्ट दिसेल.

औचित्यविचाराचें महत्त्व कवीला काव्य करणाच्या दृष्टीने व रसिकाला रसग्रहण आणि काव्यपरीक्षण या दृष्टीने आहे. संस्कृत साहित्य-शास्त्रांत या दोन्हीहि दृष्टींनी त्याचें विवेचन झालेलें आहे. रसयुक्त काव्य हें जर औचित्यानुसारी असेल; तर तें काव्य अमर होतें, असा ध्वनिकाराचा निर्वाळा आहे---

रसभावादिसंबद्धा यद्यौचित्यानुसारिणी ।
अन्वीयते वस्तुगतिर्देशकालादिभेदिनी ॥
वाचस्पतिसहस्राणां सहस्रैरपि यत्नतः ।
निबद्धा सा क्षयं नैति प्रकृतिर्जगतामिव ॥

ध्वन्यालोक उद्योत ४ कारिका ९, १०

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावगीत

प्रा. भवानीशंकर श्री. पंडित, एम्. ए.

● नागपूरचे विख्यात कवि व साहित्यिक प्रा. भ. श्री. पंडित यांनी या लेखांत भावगीताच्या स्वरूपांचें दिग्दर्शन केलेलें आहे, तें मार्मिक आहे. प्रा. पंडित यांच्या कवितेप्रमाणेंच त्यांचें गद्यहि फार रेखीव असतें.

★ ★ ★

यापूर्वी नियतकालिकें, कविसंमेलनें व काव्यगायनें हींच काय तीं भावगीताच्या प्रसाराचीं साधनें होतीं. आता त्यांत फोनो, सिनेरिओ व 'म्युझिक' मंडळें यांची भर पडली आहे या नवीन साधनांना संगिताची साथ आहे आणि ध्वनिक्षेपकांचें साहाय्य आहे. त्यामुळे समाजांत तथाकथित भावगीताचें आकर्षण विशेष वाढलें आहे. भावनेचा संबंध मनुष्याच्या हृदयाशी आहे. त्यांतून ती उगम पावते व त्यांतच ती विलीन होते. तिचा गीताशीं सरळ संबंध आहे. गीतात अनुप्राणित झालेली भावना सहज व विनायास हृदयंगम होते. त्यामुळे भावगीत ऐकणाराचें हृदय रसाने व्याप्त होतें व त्याला अनुभवाचा स्वाभाविक आनंद प्राप्त होतो. भावगीताला लोकप्रियता लाभली आहे, ती अशी. परंतु सध्याच्या सवंग लोकप्रियतेमुळे त्याच्या शुद्धतम सत्त्वाची व यथार्थ स्वरूपाची ओळख पटेनाशी झाली आहे.

भावगीत हें मूळचें ग्रीक. विणेप्रमाणें दिसणारें, पण आकाराने लहान असणारें 'लायर' या नांवाचें एक वाद्य असे. त्यावर हें गीत वाजविण्यांत येई. म्हणून त्यास 'लिरिक्' म्हणत. 'लिरिक्' पुढे इंग्लंडांत गेले व 'इंग्लिश' झालें. आपल्याकडे इंग्रजी वाङ्मयाचें परिशीलन सुरू झालें, तेव्हा तें इकडे आलें. अंगच्या गुणांमुळे आपल्या कवींना तें प्रिय झालें व त्यांनी त्यास आपणावलें. आरंभीं–आरंभीं त्याला वीणागीत, वैणिक, तंतुगीत— हीं जीं नांवें मिळालीं, तीं पुढें लोप पावलीं व भावगीत हेंच नांव पुष्कळ प्रमाणांत अन्वर्थक आहे.

आपल्या प्राचीन वाङ्मयांत भावगीतास स्वतःचें असें वेगळें अस्तित्व नव्हते. काव्य या व्यापक संज्ञेत तें अंतर्भूत होतें. तरी पण स्त्रियांच्या ओव्या व गीतें, संतांचे अभंग व पदें आणि शाहिरांच्या लावण्या व पोवाडे यांत विपुल प्रमाणांत त्याच्या मूलभूत गुणांचा आढळ होतो. मात्र अभंग वगळल्यास इतर रचना प्रकारांत ते गुण निर्भेळ स्वरूपांत सहसा दिसत नाहीत. अभंगांतहि एकच भक्तिभाव आहे; पण वृत्तिवैचित्र्यामुळे ते उत्कट उतरले आहेत. ज्ञानेश्वर-एकनाथांच्या प्रबंध काव्यांत आणि पंत–पंडितांच्या कथाकाव्यांत जे जे भाग अत्युत्कट आहेत, ते ते सर्व भावगीतात्मकच आहेत. आजचें आपलें भावगीत इंग्रजींतून जन्माला आलें असलें, तरी त्यावरले संस्कार मराठी आहेत. ते कसे, हें पुढे ओघाओघाने येईलच.

भावगीत हें काव्याच्या अन्य प्रकारापेक्षा निराळें कसें आणि त्याचे विशेष कोणते, हें Hegel या नांवाच्या विवेचकाने थोडक्यांत स्पष्ट केलें आहे. तो म्हणतो, " The lyric—poet draws to himself all the world, subjectifies it by penetrating it with his own personal feeling, and then expresses it in forms appropriate to his subjectivity. Thus, the lyric is distinguished from other major types of poetry as an utterance of personal subjectivity, emotive and imaginative. " यावरून असें दिसतें की,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावकवि हा अखिल सृष्टीच्या अंतरंगांत शिरतो. तेथील अनुभव प्राप्त करतो. त्यावर आपल्या स्वतःच्या अनुभवाच्या छटा चितारतो. आणि, मग तो अनुभव आपुल्या मनोवृत्तीला अनुसरून-अनुकूल अशा छंदांत शब्दांच्या द्वारें प्रकट करतो. तेव्हा भावगीतांत आत्मानुभूतीची अभिव्यक्ति, स्वयंस्फूर्ति व कल्पनाशक्ति हीं जीं वैशिष्ट्यें असतात, तीं काव्याच्या अन्य प्रकारांत नसतात.

भावगीतांत कवीच्या व्यक्तिगत भावनेच्या आविष्करणाला विशेष महत्त्व आहे. आविष्कृत भावना अत्युत्कट व उत्स्फूर्त असावी. ती जितकी विशाल व व्यापक, तितका तिचा आस्वाद घेणारें रसिक अधिक. सार्वजनिक अनुभव ज्या त्वरेने अंतःकरणास पटतो, त्या त्वरेनें विशिष्ट अनुभव पटत नाही. यासाठी कवीचें निरीक्षण सूक्ष्म असावें, अवधान तिखट असावें व अनुभव सर्वस्पर्शी आणि खोल असावा. सृष्टीच्या क्षेत्रांत एकादा विषय काव्यानुकूल दिसतांच त्याचें अंतःकरण तत्क्षणीं उचंबळून यावें. आपले नवं नवे विचार, वेगवेगळे भाव, निरनिराळ्या वृत्ति, क्षणाक्षणाला बदलणाऱ्या लहरी आणि विविध व विपुल अनुभव यांचा उद्रेक होतांच त्यांच्यावर त्याला समर्पक शब्दांचा साज चढवतां यावा.

भिन्नभिन्न भावनांचा विचार केल्यास भावगीताचे भिन्नभिन्न वर्ग करतां येतील. ज्यांत प्रेम प्राधान्याने आहे, तें प्रेमगीत, ज्यांत देशभक्ति प्रामुख्याने आहे, तें राष्ट्रीय गीत, ज्यांत ग्रामीण वातावरण आहे, तें ग्रामगीत आणि ज्यांत वात्सल्याचें माहात्म्य आहे, तें शिशुगीत, असे त्याचे वर्ग कल्पिल्यास ते कधींहि संपणार नाहीत. वर्गवारी करावयाचीच झाल्यास तिच्यांत दृष्टि थोडी स्थूल ठेवावी लागेल आणि सोय बघावी लागेल. मात्र भावगीतांत आदीपासून अंतापर्यंत भाव एकच असावा तो प्रांजळ व प्रामाणिक पाहिजे, तरच भावगीत परिणाम करील.

भावगीतांतील भाव स्वतः कवीचा असतो. पण कित्येककदा कवि एखादें कथासूत्र घेऊन त्यांतील पात्रांवर तो लादण्याचा खटाटोप करतो. या ‘नाटका’ मुळे तें भावगीत ‘नाट्यगीत’ होतें. ही लपवाछपवी योग्य नाही. कारण भावगीतावरून कवीचा स्वभाव अगर परिचय पडताळतां येतोंच, असें नाही. वृत्ति ही क्षणिक असल्यानुळे तिच्या भरांत रचलेलें काव्य हें कवीच्या स्थिरस्वभावाचें निदर्शक असतेंच, असें म्हणतां येत नाही. तेव्हा कवीने उगीच सोंगढोंग करण्याचें कारण काय? उलट त्याच्या मखलाशीमुळे अपसमज मात्र पसरतात.

भावगीताचा संभव होतो त्यावेळची कवीची चित्तवृत्ति क्षणिक असल्यामुळे भावगीताचें स्वरूप साहाजिकच त्रुटित व सुटसुटित असतें. म्हणूनच L. Brander हा विवेचक “the lyric is short and emotional” असें म्हणतो. भावगीताचा उद्रेक होत असतांना कवीच्या मूळ वृत्तींत बदल झाला, तरी तो अत्यल्प असावा. किंबहुना, तो होतांहोतांच भावगीत पूर्ण व्हावें. मूळ वृत्तींत संपूर्ण पालट झाल्यास भावगीतांतील एकांतिक आतुरता नष्ट होते.

भावगीतांत कवीची आत्माभिव्यक्ति असते. तेव्हा अर्थात्च त्यांत प्रयुक्त केलेली लेखनशैली ही व्यक्तिनिष्ठ (Subjective style) असते. या शैलींत प्रथम पुरुषी भावनिवेदन असल्यामुळे तें वाचकाशी साक्षात् विनिमय करतें व हृदयस्पर्शी ठरतें. भावगीत लोकांत विशेष प्रिय असण्याचें एक कारण या शैलीचें प्रभावित्व आहे.

भावगीतांत ‘गीत’ हा शब्द आहे. तेव्हा तें गेय असावें, हें ओघानें आलेंच. ग्रीक ‘लिरिक’ गेय होतें, हें वर सांगितलेंच आहे. परंतु त्याच्या इंग्लिश अवतारांत ती गेयता काटेकोरपणाने राहिली नाही. कारण ‘सानेट्’ या काव्यप्रकारांत भावनेचें आविष्करण आहे, पण गेयता नाही. Brunltiere या काव्यचिकित्सकाच्या मतानुसार त्यांत inward song म्हणजे मूकगेयता अथवा परोक्ष संगीत आहे. वास्तविक ही मूकगेयता भावनेच्या सुकुमारतेमुळे, वेचक वर्णांच्या मधुरतेमुळे, समर्पक शब्दांच्या सुंदरते-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुळे, त्यांच्या शिल्पसदृश योजनेमुळे, त्यांच्यांतील नादाच्या श्रुतिसुभगतेमुळे आणि छंदाच्या रेखीव रचनेमुळे उत्पन्न होत असते. या गोष्टी गौण आहेत, असें मानण्याचें कारण नाही. कारण Carlyle सारख्या सुप्रसिद्ध साहित्यिकाने "Poetry is musical thoughts" काव्याच्या व्याख्येमध्ये गेयतचें तत्त्व मान्य केलें आहे. Coleridge सारख्या विचारवंत कवीने "Poetry is the best words in their best order" या व्याख्येंत सुंदर शब्द व रेखीव रचना यांना महत्त्व दिलें आहे. Alfred Austin या समीक्षकाची मजल तर फारच पुढे गेली आहे. तो म्हणतो,— "No verse, which is unmusical or obscure, can be regarded as poetry whatever other qualities it may possess." थोडक्यांत असें म्हणतां येईल की, काव्य हें गेय नसलें, तरी निदान त्याची रचना तरी अशी असावी की, त्यांतील समर्पक शब्द हे आघातपूर्वक उच्चारतांच आणि त्यांतील कोमल वर्ण हे हळुवारपणाने तोंडाबाहेर काढतांच रसिक आनंदाने अस्वस्थ व्हावा.

येथे कदाचित् अशी एक शंका निर्माण होण्याचा संभव आहे की, जर शब्दांकडे व छंदाकडे लक्ष वेधलें, तर कवितेंतील भावाची उपेक्षा होईल व त्यामुळे रंगाचा भंग होईल. पण ही शंका व्यर्थ आहे. कारण जातिवंत कवीचे उद्गारच भावगर्भ असतात आणि ते सोयिस्कर छंदांतच बाहेर पडतात. ते मुखावाटे निघत असतानाच त्याची बुद्धि औचित्य व संयम हे दोन नियंत्रक घेऊन सज्ज असते. त्यामुळे त्याच्या काव्यांत वाणी व अर्थ यांचा एकजीव दृष्टीस पडतो. "The sound should seem an echo to the sense" असें जें Pope म्हणतो, तें याच अर्थाने.

आपल्याकडे भाव व संगीत हे परस्परांस पूरक मानले आहेत. भाव शब्दाचें रूप घेत असतांना त्यांत संगीतांतलें आंदोलन उत्पन्न व्हावें, याकरिता वाक्यांच्या नियमित विन्यासाची आवश्यकता असते. म्हणूनच आपल्या अक्षरगण, मात्रागण व अक्षरसंख्याक पद्यांत नियमित चरण दृष्टीस पडतात. मात्रागणांतील चरणाची उभारणी लघु अक्षराची एक मात्रा व गुरु अक्षराच्या दोन मात्रा या तत्त्वावर झाली आहे. आणि, याच तत्त्वाचा संगीतास आधार आहे. यांत स्वरांच्या आरोहावरोहास स्वाभाविक भरपूर वाव सापडतो. त्यामुळे भावगीत हें मात्रावृत्तांत विशेष परिणामकारक वटतें. ज्या अक्षरगणवृत्तांत एकच गण आवृत्त झाला असेल, त्यांत तें उत्तम वाटतें. कारण त्याच त्या गणाचें आवर्तन संगीतास पुष्कळ प्रमाणांत पोषक होतें. गज्जलांत त्याचत्या गणांची आवर्तनें आहेत, म्हणूनच ते गेय असतात. अक्षरसंख्यांक छंद सुरावर म्हणावयाचा झाल्यास त्यांत कमीअधिक मात्रांची घालमोड करावी लागते.

अलीकडे अलीकडे भावगीत गायनास वाद्यांची साथ देण्याची टूम पसरली आहे. वस्तुत: ती अनवश्यक आहे. भावगीतांत भाव मुख्य असल्यामुळे गेयतेचें नसतें स्तोम माजविण्याचें कारण नाही. उलट या वाद्यांच्या पायीं कित्येकदां भावगीताची मान मुरगळली जाते आणि पाय निरगळले जातात. उदाहरणादाखल गोविंदराव जोशांनी माधवज्यूलियनच्या भावगीताचे 'प्रेम कोणी। ही करीना। का अशी फिर। याद खोटी'— हें जे हाल केले आहेत, ते वधवत नाहीत. यासंबंधीं Drinkwater या टीकाकाराचें मत विचारणीय आहे. तो स्पष्ट सांगतो की, "Whenever a true poem is given a musical setting, the strictly poetic quality is destroyed."

आपल्याकडेहि केशवसुतादि ज्या कवींनी भावगीत प्रचलित केलें, त्यांनी गेयतेला अवास्तव महत्व दिलें नव्हतें. काव्यगायनाची प्रथा गोविंदाग्रजांच्या नंतरच्या पिढींत पडली. आणि वादनाची साथ तर परवांपरवांची आहे. आपल्याकडे भावगीत आलें, ते इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने व अनुकरणाने. अर्थातच त्यांत मूळ ग्रीक 'लिरिक्'मधील गेयता असण्याचें कारण नव्हतें. केशव-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुतांनी ‘ सॉनेट ’ आणलें, तें इंग्रजींतल्यासारखेंच अगेय आहे. मात्र आपल्याकडे भावगीतें लिहिणारांची जी यशस्वी परंपरा निर्माण झाली, तिच्यांतल्या नामवंतांनी भावगीताचें अंतरंग आत्मसात केलें, पण बहिरंग मात्र आपलेंच कायम ठेवलें. त्यामुळे भावगीतांत आरंभीं एक अगर दोन चरणांचें पालुपद, नंतर जास्तच जास्त तीन चरणांचा अंतरा व शेवटीं पुन्हा एक चरणाचें कडवें असा प्राचीन पदपद्धतीचा थोड्याफार फेरबदलाने अवलंब केल्याचें दृष्टीस पडतें. त्यांत क्वचित् त्याच त्या शब्दांचा पुनरुच्चार आढळतो, तो जुन्या ओव्यांतला अवशेष आहे आणि मधून मधून दिसणारा भावगत उद्गारांचा प्रकार हा अभंगांतून व पोवाड्यांतून परंपरित झाला आहे. भावगीताला सध्या जें स्वरूप प्राप्त झालें आहे, तें निरनिराळ्या प्रकृतीच्या व वेगवेगळ्या परिस्थितींत वाढलेल्या कवींच्या तपांचें फळ आहे.

एखादें विवक्षित भावगीत निर्माण होण्यास कोणता प्रसंग निमित्त झाला, हें कळलें कीं, त्या गीताचा रसास्वाद घेतांना द्विगुणित आनंदाचा लाभ होतो. ‘पाखरा ! येशील का परतून ?’ हें टिळकांचें त्यांचा बालकवींशी असलेला पितृतुल्य संबंध ज्याला ठाऊक असेल, त्याच्या अंतःकरणाचा तत्काळ ठाव घेईल. ‘सागरा ! प्राण तळमळला ’ हें सावरकरांचें भावगीत त्यांची देशभक्ति व इंग्लंडमधली वसति ज्याला माहीत असेल त्याच्या हृदयाला स्पर्श करील. यासाठी भावगीतांतला प्रसंग लक्ष्यांत यावा, म्हणून त्यावर सूचक टीप अगर खाली दिनांक निर्देश अवश्य असावा. कवीची विशिष्ट काळांतली वृत्ति, विचारभाव अथवा लहर त्याच्या भावगीतावरून तेव्हाच ओळखतां येते. केशवसुतांचें ‘ प्रत, ’ दत्ताची ‘ दीपका ! ’, गोविंदाग्रजांचें ‘क्षणभर वेड्या प्रेमा ! थांब, बालकवींचें ‘शून्य मनाच्या घुमटांत’ आणि बोवड्यांचें ‘ वैताग ’ हीं काव्यें या दृष्टीने वाचनीय आहेत. त्यांत त्या त्या कवीचा प्रांजल व प्रामाणिक भाव उत्कटतेने अभिव्यक्त झाला आहे. भावगीताचा उद्रेक कसा स्वाभाविक असतो, हें तांब्यांच्या ‘ मरणांत खरोखर जग जगतें ’ व ‘ मधु मागसि माझ्या सख्या ! परी ’ या भावगीतांतील सहजोद्गारांवरून चटकन् लक्ष्यांत येते. भावगीतांत कल्पनेच्या सहवासाने भावना कशी स्पष्ट होते; हें दत्तांच्या ‘ बघुनि मन धालें ’ या गीतावरून समजतें. भावगीताची भाषा कशी अर्थव्यंजक असते, तिचा भावाशीं कसा एकजीव असावा लागतो, हें लक्ष्मीबाई टिळकांच्या ‘ मी तुझी मावशी तुला न्यावया आलें ’— या गीताने सिद्ध होतें. भावगीतांतला भाव सरळ असावा म्हणजे तो तात्काळ हृदयंगम होतो, याचें प्रत्यंतर विनायकांच्या ‘ वदवेना मला लागे हुरहुर जी तुजमुळे ’ या कवितेने आपसुक पटतें. भावगीत संक्षिप्त असलें की, तें परिणामकारक होतें, याची साक्ष Bee कवीची ‘ पिकलें पान ’ ही कविता देईल, अथवा रेंदाळकरांचें ‘ अजुन चालतोच वाट माळ हा सरेना ’ हें आर्त–आर्द्र गीत पुरावा म्हणून पुढें ठेवतां येईल.

आपल्याकडे भावगीत ज्याकाळीं प्रचारांत आलें, त्याकाळीं नाटकमंडळ्यांची चलती असल्यामुळे त्यांच्यांतील गाण्यांच्या साध्या चालींचा भावगीतास अप्रत्यक्ष उपयोग झाला. भावगीतांमुळें पूर्वी शब्दार्थांच्याकडे दुर्लक्ष करण्याची जी वृत्ति असे, तिला आळा बसला, अस्पष्ट विचार, विस्कळीत उच्चार व बेढब रचना यांना पायबंद बसला, मांडणी सुबद्ध व बांधेसूद झाली आणि एकंदर कवितेचें रूप प्रसन्न, निरामय व भावगम्य बनलें.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीच्या माहेरांत—

न. शे. पोहनेरकर,
साहित्यविशारद

● निजाम हैद्राबाद चे तरुण साहित्यिक रा. पोहनेरकर यांनी या लेखांत मराठीचें माहेर जो मराठवाडा त्याचें संशोधनदृष्ट्या महत्व वर्णिलें आहे. या लेखांत उद्धृत केलेलीं शिवाजी—वगैरेंची तीन ऐतिहासिक पत्रें महत्वाचीं आहेत.

★ ★ ★

भारत वर्षाच्या इतिहासांत महाराष्ट्राला एक स्वतंत्र असें मानाचें स्थान आहे. हिमालयाच्या भव्यतेला आणि तपस्वी गंभीरतेला आपल्या अनेक अभेद्य दुर्ग शिखरांनी सह्याद्रि हा साभिमान मानाने अभिवादन करतो, तर गंगा—यमुनांच्या प्रशांत—ओघांशी गोदा—कृष्णा या हास्याचें हितगुज करितात. गंगा—यमुनांच्या काठीं मातींतून सोनें पिकविणारीं सुपीक शेंत हिरवळीने हसतात, तर गंगाथडीची ‘काळी माय’ आपल्या कंगाल कच्या बच्चांना मोत्यांचीं भरघोस कणसें देऊन कुबेर बनविते. सारांश, भारताच्या भव्य भाग्याची महाराष्ट्र हा सन्मान—प्रतिमा आहे, असें म्हटल्यास वावगें ठरणार नाही.

मराठवाड्याची उज्वल परंपरा

महाराष्ट्राचा इतिहास आजतागाईत जो गाजला, तो गोदाकृष्णांच्या मध्यभूमींत! पुण्या—मुंबई कडचा प्रांत किंवा इतर पसरलेला महाराष्ट्र यापेक्षा देखील इतिहास, संस्कृति, धर्म, भाषा यांच्या प्रांतांत मराठवाड्याचें सर्वतें महत्त्व आहे. माय मराठीचा पहिला वहिला बोबडा बोल गोदामातेच्या तरंग—लहरींवरून गायिला गेला, तर मराठी सन्मानाची पहिली समशेर देवगिरीच्या दुर्ग परिसरांतच पहिल्याने म्यानांतून बाहेर पडली आहे. शिखर शिंगणापूरच्या शंकराचा संस्थापक सिंघण यादव किंवा हिन्दुपदपादशाहीचें रणशिंग फुंकणारे जाधव आणि भोसले मराठवाड्यांतच संगोपन पावले आहेत. मराठीच्या वाङ्मय भांडारांत ‘अमृताशी पैजा लावून’ विवेक सिंधूचें मंथन करून, लक्ष वाहण्याचा संकल्प पूर्ण करणारे एकनिष्ठ पाईक मराठवाड्याने महाराष्ट्राला दिले आहेत. महाराष्ट्राची आदिभूमि म्हणून मराठवाड्याचा मान इतिहासांत अढळ आहे. प्राचीन उज्वल परंपरेचा खराखुरा साक्षीदार मराठवाडा आहे. परंतु अजून त्याचें मंथन, संशोधन व्हावयाचें आहे. सशोधकांचे परिश्रम तेथे खर्ची पडावयाचे आहेत. जुन्या इतिहासाचें कितीतरी दुवे कोनाकोपऱ्यांत धूळ खात, संशोधकांची आशेने मार्ग प्रतीक्षा करीत, प्रतिदिवशीं होणाऱ्या अनास्थेच्या घावांनी घायाळ होऊन तळमळत असतील.

संशोधनांचे त्रोटक—प्रयत्न

मराठवाड्याच्या संशोधन—कार्याचा त्रोटकसा इतिहास येथे आपणांस पहावा लागणार आहे. कै. इतिहासाचार्य राजवाडे, कै. ह. भ. प. पांगारकर, महामहोपाध्याय द. वा. पोतदार-इत्यादि इतिहासतज्ज्ञांनी आणि संशोधकांनी मराठवाड्याचा दौरा केला. परंतु तो दौरा विहंगम दृष्टीचा होता. अर्थात् परस्थांना यापेक्षा अधिक ते काय करणें शक्य होतें! मराठवाड्यांतून या संबंधीं आजपर्यंत भरीव आणि पद्धतशीर असे प्रयत्न फार थोडे झाले. नाही म्हणावयास आरंभी रा. दत्तोपंत कुळकर्णी यांचें ‘तुळजा भवानी’ हें पुस्तक आणि रा. काटे वकील, सेलू, यांचें ‘संपूर्ण भूषण’ हींच दोन पुस्तकें स्थानिक संशोधनाचीं व स्थानिक संशोधकांची म्हणून, मराठवाडा दाखवूं शकतो. आमच्या येथील सरकारी संशोधन खात्यांत रा. र. मु. जोशी, एम्. ए., उस्मानिया विद्यापिठांतील प्रा. चि. नी. जोशी व र. म. भुसारी इत्यादि मंडळींनी या संबंधीं बरेंचसें कार्य केलें आहे. प्रा. नारायणराव नांदापुरकर यांचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संशोधन–परिश्रमहि अविस्मरणीय आहेत. याशिवाय खाजगी किंवा वैयक्तिक असे प्रयत्न पाहूं जाता, नांदेडचे रा. वि. अ. कानोले यांचा प्रथम उल्लेख करणें आवश्यक आहे. चिकाटीने परिश्रम करून त्यांनीं नांदेड शहर व त्याची पंचक्रोशी हळू हळू चाळून काढली आणि नांव घेण्यासारखा जुन्या ग्रंथांचा संग्रह सजविला. वामन पंडितासंबंधीं त्यांनी बाहेर आणलेली नावीन्यपूर्ण माहिती विद्वन्मान्यता पावली आहे हें निश्चित.

मराठी मंडळाचा उपक्रम

संशोधनाची ही शाखा मराठीच्या अध्ययन-अध्यापनाची जोपासना करीत असतांनाच उघडावी, अशी हैदराबाद दक्षिण, येथील मराठी मंडळाची तीव्रतर इच्छा होती. तो योग अनायासे गतवर्षी जुळून आला. मराठवाडा–साहित्य परिषदेचे अध्यक्ष या नात्याने रा. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी जेव्हां आपला यशस्वी दौरा काढला, तेव्हा त्यांच्या सोबत मलाहि कांहीं दिवस राहावें लागलें. तेथे परळी वैद्यनाथ या गांवी आम्हांला बरेचसे ऐतिहासीक कागदपत्र आणि ग्रंथ मिळाले. साहजिकच मराठी मंडळाच्या महत्वाकांक्षेला हाच यशाचा मुहूर्त समजून संशोधन शाखेची जोड देण्यांत आली आणि आजहि तें कार्य चिकाटीने चालू आहे. बीडहून सुप्रसिद्ध दैवज्ञ पंडित घराण्यांतील बहुमोल संस्कृत साहित्य, परतूड येथील जुना ग्रंथसंग्रह यांचें संकलन हळूहळू मराठी मंडळ करीत आहे. उपलब्ध ऐतिहासिक पत्रांपैकी कांहींची वानगी मराठी–प्रेमी बंधु-भगिनींना पोचती करावी, अशी सुहृदांची प्रेमळ आज्ञा झाल्याने आज वाचकांना हे चार शब्द वाचण्याची तसदी देण्यांत येत आहे.

तीन कालांतील अभयपत्रें

सोळाव्या शतकांतील मराठ्यांच्या यशस्वी क्रांतीला आधारभूत असें तत्त्व कोणतें होतें, या संबंधीं अभ्यासकांत मतभेद आहेत. धर्मावरील संकटाच्या जाणिवेने मराठा वीर पुढे सरकला असें एका पक्षाचें मत, तर केवळ वर्ग कलह आणि आर्थिक विषमता यांतूनच ती जन्म पावली असें दुसरा म्हणतो. आपापल्या मतसमर्थनार्थ अनेकविध पुरावे उभय पक्षांच्या संग्रहीं आहेत. यासंबंधीं आम्हांला नवीन सिद्धांत असा कांही मांडावयाचा नाही. श्रीक्षेत्र परळी वैजनाथ या गांवीं आम्हांला तीन कालांतील सत्ताधीशांचीं तीन अभयपत्रें सांपडलीं आहेत. पहिलें श्रीछत्रपति शिवाजी महाराजांचें, दुसरें श्री छत्रपति शाहू महाराजांचें आणि तिसरें पेशवे कालीन. या तिन्ही अभय पत्रांतील मजकुराचा साकल्याने विचार केला असतां, त्या वेळच्या या पराक्रमी मंडळींना केवळ वर्गकलहाच्या आणि आर्थिक विषमतेच्या आचेने प्रज्वलीत केलें होतें, असेंच केवळ म्हणतां येणार नाही.

'कांतिनगरी' परळी वैजनाथ

श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ही पुराण कालांतील 'कांतिनगरी' असून मध्ययुगातील 'परलीवैजनाथ' अशा नांवाने तिचा उल्लेख करण्यांत येतो. संस्कृत भाषेंत 'पर्यली' अशा प्रकारचें नांवहि सापडते. शिवलीलामृतांत ज्या सती चांगुणेने आपला एकुलता एक पुत्र श्रीशंकरासाठी बळी दिला. तिच्या धीर वीर पतीची, श्रियाळ राजाची ही राजधानी! 'यस्येयन्नगरी सदा–सुखकरी कांतीपुरी सुंदरी' अशा प्रकारें एका संस्कृत श्लोकांत येथील महत्वहि वर्णिलें आहे. भारत वर्षांत प्रसिद्ध अशा प्रकारचीं जी बारा ज्योतिर्लिंगांचीं म्हणून क्षेत्रें प्रसिद्ध आहेत, त्यांपैकी श्रीपरळी वैजनाथ हें एक असल्याने त्याचें भारत-वर्षांतील हिन्दु जनतेला अतिशय महत्व आहे. मराठ्यांच्या अमदानींत अशा प्रकारच्या धार्मिक क्षेत्रांचें संरक्षण व्हावें, इतकेंच नव्हे तर सैन्याच्या मार्गांत अशा प्रकारचीं ठिकाणें आल्यास त्यासंबंधी तत्कालीन मराठी राज्याच्या अधिकाऱ्यांचें धोरण काय असें, याचा स्पष्ट बोध प्रस्तुतच्या अभय पत्रांतून होतो. आमच्या संग्रही असलेल्या प्रतीबरहुकूम त्या तीन्ही अभयपत्रांचा मजकूर वाचकांसाठी खालीं उतरून देतों. कागद दौलताबादी असून तीन्ही अभयपत्रें मोडी लिपींत आहे.

देवस्थानाच्या संरक्षणार्थ आज्ञा

(१) स्वस्ती श्री राज्याभिषेक सके ६ सौम्यार्थी नाम संवत्सरे कार्तीक बहुल पचमी बुध वासरे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्षत्रीये कुळावतंस श्री राजा सीव छत्रपती यानी देसमुखानी व समस्त ब्राम्हण व प्रजा कसबे परली यासी आज्ञा केली, दीलहे आभयेपत्र येसा जे, श्री ×××× देवस्थान येथे आहे. क्षत्रीचा गाव. या करिता येथे स्वामीचे सेनेचे लोक आलीया कोन्ही उपद्रव करू नये, खडनी घेऊ नये, येसी आज्ञा आहे. आजी परियंत कोन्ही उपद्रव दीधला नाही. पुढेहि देणार नाही तुम्हास आभयेपत्र दीलहे आसे. आमचे लोक, सेना या मार्गी येतील, जातील, त्याकरिता तुम्ही गाव सोडून जाण्याची गरज नाही. सुखे गावी आसत जावे. वरा कोलाचा कागद त्याला दाखवीत जाणे. म्हणजे कोन्ही तुमचे वाटेस जाणार नाही. आभये आसे. जानीजे. लेखनालंकार.

(२) स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ३६ विरोधी संवत्सरे भाद्रपद शुद्ध चतुर्दसी भोमवासरे क्षत्रीये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणे देशमुख व देशपांडे पा॥ परेली यासी दीलहे अभेयपत्र ऐसे जे, तुम्ही विनंतीपत्र पाठविले, ते प्रदीष्ट होऊन लीहीले वर्तमान वीदीत जाळे. पा॥ मा॥स डोंगरी फौजा राहून उपद्रव देतात, त्यामुळे पा॥ मा॥र वेरान जाला याकरिता स्वामींनी कृपाळू होऊन लस्करास ताकीदपत्र व पा॥ मा॥स अभयेपत्र सादर करावया आज्ञा केली पाहिजे, म्हणून लीहीले. त्यावरून लस्करास ताकीदपत्र व हे तुम्हास अभयेपत्र सादर केले असे. तरी कोणे वीसीं शक-अंदेशा न धरिता पा॥ मा॥रीं राहून कीर्दि आबादानी करून सुखरुपें राहणे. कोणाचा उपसर्ग लागणार नाही. अभये असे. लेखनालंकार. 'मर्यादेयं राजते.'

(३) श्री ××× श्रीवैजनाथ

आ॥ स्वारी राजश्री गोपाळराव गोवींद दी॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान ता॥ क्षेत्रे पाली सुमासलास खमसैन मया व आलफ श्रीक्षेत्रास लस्कराचा आमचे उपसर्ग लागणार नाही. क्षेत्र मजकूरी लस्कराचे उपसर्गावीसी चींता न करणे, सुखरुपे राहणे, क्षेत्र मजकूरचा घासदाणा वेदमूर्ती समस्त ब्राह्मणास देवीला आसे. जाणीजे. छ १५ सफर.

अक्षयपत्रांचें स्वरूप

या तिन्ही अभयपत्रांपैकी पहिलें आज्ञापत्र हें अस्सलची समकालीन नकल आहे. मोडी लिपीचीं वळणें शिवकालीन स्पष्ट आहेत. यांत १४ ओळींत सर्व मजकूर आला आहे. दुसऱ्या अभयपत्रांत पहिल्या भागीं १२ व पाठीमागें २ अशा एकूण १४ ओळी आहेत. हें अस्सल असून, यावर 'शंभु सूतो + + मुद्रा शिवराजस्यराजते' या अक्षरांचा अष्टकोनी शिक्का, 'शिवनरपती हर्षनिधान मोरेश्वरसुतभैरव मुख्यप्रधान' या अक्षरांचा गोल शिक्का आणि 'श्रीशंकर श्रीशाहु छत्रपती कृपानिधी प्रल्हादसुत गदाधर प्रतिनिधी' अशा अक्षरांचा अष्टकोनी शिक्का असे तीन स्पष्ट ठसे आहेत. शेवटीं षट्कोनी मर्यादेयं राजते' ही मुद्रा आहे. तिसऱ्या अभय पत्राच्या शेवटीं 'मोर्तबसुद' ही गोल मोहोर आहे.

क्रमांक १ व ३ चे कागद रा. खंडेराव धोंड (यांच्या पूर्वजांकडे पेशव्यांचे तीर्थोपाध्यायपण होतें व यांचा राहता वाडाहि श्रीमंत सदाशीवराव भाऊनी परळीस आल्यावेळीं बांधून दिला आहे.) त्यांच्याकडे मिळालीं. नं. २ चें अभयपत्र रा. देवीदासराव देशमुख चव्हाण यांच्याकडे सापडलें. अर्थात् तिन्ही कालांतील या सत्ताधीशांची 'हीं आपलीं परंपरेचीं पुण्यस्थानें आहेत. त्यांचें संरक्षण आणि संवर्धन करणें आपलें कर्तव्य आहे,' अशी भावना असल्याचे आपणांस स्पष्टपणें दिसतें. क्रमांक १ व २ हीं अभयपत्रें मराठी मंडळाने आपल्या संशोधन–विभागाकडून स्वतंत्रपणें मुद्रित केलीं आहेत. रियासतकार रा. ब. सरदेसाई यांनी 'हीं दोन्हीं पत्रें चांगलीं आहेत,' असा अभिप्राय देऊन त्यांची इंग्रजी तारीखहि पाठवून दिली आहे. श्रीशिवाजी महाराजांच्या अभयपत्राची तारीख १२ नोव्हेंबर १६७९ अशी असून श्रीशाहू महाराजाच्या अभयपत्राची ६ सप्टेंबर १७०९ अशी आहे.

निकसनें संशोधन व्हावयाला हवें

मराठवाड्याचें ऐतिहासिक आणि सांस्कृतिक प्राचीनत्व मान्य करून सुद्धां अजूनपर्यंत त्याचें पद्धतशीर संशोधन झालेलें नाही, हें उघड आहे. किती तरी ठिकाणें व स्थानें अशीं आहेत की,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्यांच्या पाठीशी उज्ज्वल असा इतिहास आहे. किती तरी जुनीं घराणीं अशीं आहेत कीं, ज्यांनी आपल्या कर्तबगारीने एके काळीं इतिहास सजविला आहे. या सर्व गोष्टींचें, बाबींचें संशोधन होऊन महाराष्ट्राचा इतिहास भविष्य कालांत निःशंकपणें लिहितां येईल. सुवर्ण गरुडांकित विजयपताका ज्यांनी महाराष्ट्रांत अमर केली, त्या यादवांच्या राजवटीविषयींची आजची माहिती ही अत्यंत अपूर्ण अशी आहे. कदाचित् संशोधनांत त्या काळावर प्रकाश टाकणारी कांही साधनें उपलब्ध होणें अशक्य नाही. या पवित्र अशा सांस्कृतिक व सामाजिक कार्यांत सत्याच्या अभिमानाने पुढे येणें हें इतिहासप्रेमी आणि अभ्यासी मराठी भाषाभिमान्यांचें पवित्र कर्तव्य आहे. कितीतरी ठिकाणीं अशीं साधनें कसर व वाळवी यांच्या भक्ष्यस्थानीं पडत असतील. परंतु तीं ज्यांच्या ताब्यांत आहेत, त्यांना त्यांचें महत्व कळणें दुरापास्त आहे.

मोडीचा पुनरुद्धार करा.

दुसरा एक महत्त्वाचा उल्लेख याच लेखांत करावासा वाटतो. तो असा की, मराठवाड्याचा हा अभिमानास्पद असा इतिहास जुन्या मोडी लिपींत लिहून ठेविलेला असतो. आमच्या आजच्या अभ्यासक्रमांत मोडीचें स्थान अत्यंत गौण असें मानण्यांत आलें आहे. उत्तरोत्तर तरुणपिढी या लिपीपासून दूरदूर जात आहे. परंतु आजची ही अनास्था पुढच्या काळांत अतिशय घातकी ठरणार आहे. आजपर्यंत खेड्यापाड्यांतील अज्ञानी म्हणविणाऱ्या समाजबांधवांनी आणि जुन्या पिढींतील विद्वानांनी ही लिपी आपल्या काळापर्यंत जोपासिली. परंतु यापुढे अशा प्रकारें उपलब्ध होणाऱ्या कागद पत्रांचें वाचन करणेंहि कठिण होऊन बसेल आणि साधनें हस्तगत होऊनहि त्यांचें मूल्यमापन करणें अशक्य होईल, तरी संपूर्ण साधनांचा संसार उपलब्ध होईपर्यंत कमीत कमी मराठवाड्याने तरी मोडीकडे दुर्लक्ष करून भागणार नाही, हें निश्चित! नवीन पद्धतीने शिकलेल्या पदवीधरांना मोडी येत नाही, म्हणून यापुढे खेड्यापाड्यांतील कामें मराठीतूनच परंतु बालबोध लिपीतून व्हावीं, अशा प्रकारची सोय सुचविण्यांत आली आहे. परंतु ही सोय पुढे-मागे अतिशय गैरसोयींची होणार आहे. यासाठी मराठवाड्याच्याच नव्हे, तर महाराष्ट्राच्या धार्मिक आणि संस्कृतीत परंपरेचें संरक्षण आणि संवर्धन होण्याच्या दृष्टीने मोडी लिपीच्या ज्ञानाचा प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा मानला जाणें आवश्यक आहे. प्राचीन इतिहास व वाङ्मय यांच्या परिज्ञानासाठी म्हणून विद्यापिठाने ज्याप्रमाणें संस्कृत ही कांहिंच्या मतें मृत भाषा Dead language असूनहि अभ्यासनीय विषयांच्या यादींत समाविष्ट केली आहे, त्याचप्रमाणें, मोडी लिपिलाहि तितक्याच महत्वाने आपल्या अभ्यासक्रमांत अंतर्भूत करणे अगत्याचें आहे. प्रतिवर्षी भरणाऱ्या मराठी साहित्य-संमेलनाने यासंबंधीं यशस्वी प्रचार आणि प्रयत्न करून मोडी लिपी जीवंत राहील, यासाठी दक्षता घेणें आवश्यक आहे.

महाराष्ट्र संस्कृतीच्या पाईकांना आवाहन

पन्नास लक्षाचा मराठवाडा! संशोधनाच्या क्षेत्रांतहि आज तो निसंशय मागे आहे! येथे संशोधक हाताच्या बोटावर मोजण्याइतके! परंतु नव्या युगाचे विचार ज्या अर्थी सर्वच क्षेत्रांतून उफाळत आहेत, त्याअर्थी आता मराठवाडाहि मागे राहणें अशक्य आहे. नाही तरी पैठणच्या परमेश्वराने—श्री एकनाथांनी संशोधनाचा पहिला श्री गणेशा कुणाहि पाश्चिमात्याच्या आधी महाराष्ट्राला शिकविला हें सूर्य प्रकाशाइतकें स्पष्ट आहे. 'ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध, परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध।'—असा अभिप्राय देऊन ज्ञानेशाची ज्ञानगंगा ज्यांनी शुद्ध स्वरूपांत महाराष्ट्राच्याकडे पठारांतून वाहविली आणि वारकरी संप्रदायांत खेळविली, त्या नाथांच्या पुण्यभूमींत संशोधकांची उणीव असावी, ही गोष्ट लाजिरवाणी नव्हे तर काय? मराठीचे अभिमानी महाराष्ट्र-संस्कृतीचे पाईक आणि मराठी मनाचे नवे तरुण आपल्या मराठवाड्याच्या गतेतिहासासंबंधीं पद्धतशीर प्रयत्न करून 'मराठी मंडळाची महत्वाकांक्षा यशस्वी करतील, अशी आशा करणें कधीहि अयोग्य ठरणार नाही, याची आम्हास खात्री वाटते.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" हेन्री ! - क्लब - ! "

मूळ लेखक : ओ. हेन्री.
अनुवादक : द. चिं. सोमण.

● कवि सोमण यांनी ओ. हेन्री यांच्या सुंदर कथेचा हा सरस अनुवाद केला आहे.

* * *

[लेखकपरिचय–ओ. हेन्रीचें खरें नांव वुइल्यम सिडने पोर्टर (१८६७-१९१०); पण ओ. हेन्री या टोपण नांवानेच त्याने सारें लेखन केलें. त्याचें सारें आयुष्य अमेरिकेंतच गेलें. त्याच्याइतका प्रसिद्धपराङ्मुख लेखक विरळाच ! ह्याने जवळ जवळ २७० लघुकथा लिहिलेल्या आहेत. प्रो. लीकॉक यांनी ' एक अत्यंत बुद्धिमान् लेखक ' अशा शब्दांत ह्याचा गौरव केलेला आहे. कथानकाला अनपेक्षित स्थळीं अनपेक्षित कलाटणी देणें हें ओ. हेन्रीचें वैशिष्ट्य ! पुढील कथा या व इतरहि अनेक दृष्टींनी वाचकांना आवडेल.]

लहानसें सार्वजनिक उद्यान होतें तें ! संध्याकाळची वेळ; तास सव्वा तासांत अंधार पडला असता.

अगदी साधा, तथापि अगदी व्यवस्थित पोषाख केलेली एक तरुण मुलगी तिथे येऊन कोपऱ्यांतल्या एका बाकावर बसली व बरोबर आणलेलें पुस्तक तिने उघडलें.

अरुंद कडा असलेल्या तिच्या हॅटच्या खालून दृष्टीस पडणारा तिचा चेहरा अतिशय मोहक व निष्पाप दिसत होता.

तिच्या जवळच्याच बाकावर एक तरुण तिच्या अगोदरच येऊन बसलेला होता आणि तिने वाचनाला आरंभ केल्यावर मधूनमधून तिच्याकडे पाहत होता. तिच्याशी ओळख करून घ्यायची संधि त्याला मिळती, तर—!

सुदैव त्याचें ! मधेच पान उलटतांना तिच्या हातांतलें पुस्तक निसटून बाकापासून थोड्या अंतरावर पडलें. त्याने चटकन् तें उचलून तिच्या हातांत दिलें आणि अर्थातच— " किती छान हवा पडली आहे आज ! " असा उद्गार काढला.

या हवापाण्याच्या गोष्टी आपल्याला वाटतात इतक्या साध्या नसतात, हं ! या गोष्टींमुळेच तरुण-तरुणींची प्रथम ओळख होते, नंतर चोरून भेटी, नंतर विवाह, नंतर समजा—घटस्फोट ! आणि, ही सारी भानगड ' काय हवा आहे पण आज ! '—या साध्या उद्गारामुळे.

त्या तरुणीने अगदी सावकाश मान वळवून त्याच्याकडे पाहिलें. चांगलाच देखणा होता तो. आणि, पोशाखहि अगदी साधा व व्यवस्थित ! अगदी सभ्य दिसत होता तो !

" बसा ना याच बाकावर वाटलं तर ! मलाहि संभाषणाची लहर आली आहे; वाचण्याजोगा उजेड उरला नाही आतां ! "

तो तिच्या बाकावर बसला !

" बोला आता कांही तरी ! " ती म्हणाली.

" काय बोलूं ? "

" कांहीहि ! त्या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांबद्दल बोला ! कुठे जाताहेत हे सारे ? सुखी आहेत का हे सगळेजण ? "

" त्यांच्याकडे पाहायला मौज वाटते, एवढं खरं ! जीवननाटकांतले नट आहेत हे सर्व लोक ! "

" मी मुद्दामच इथे येऊन बसते कधी कधी ! इथे बसलं म्हणजे खरंखुरं जीवन म्हणजे काय, हें पाहायला सांपडतं या रस्त्याकडे पाहून ! माझं स्वत:चं आयुष्य तसं कृत्रिम ! ! पण मी तुमच्याशी इतकं का बोलते आहे, ठाऊक आहे का तुम्हांला, मिस्टर······ ? "

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" पर्कन स्टॅकर ! मिस्टर पर्कन स्टॅकर !" त्याने उत्तर दिलें आणि आतां तीहि आपलें नांव सांगेल या अपेक्षेने तिच्याकडे पाहिलें.

" अंह ! " किंचित् हंसत व स्वत:कडेच बोट दाखवित ती म्हणाली, अंह !! चटकन् नांव ओळखीचें वाटेल तुम्हांला ! आणि, मग उद्याच्या साऱ्या वर्तमानपत्रांत— ! तो ठळक ठसा, तो फोटो— नकोच— असलं कांही नको, म्हणून तर हा अगदी साधा वेष करून आलें आणि हा त्यांतल्या त्यांत एकीकडचा पार्क गांठला. नशीबाने एखाद्या धनाढ्य, सुप्रसिद्ध घराण्यांत जन्म मिळाला की, असेंच वागावे लागते माझ्या सारखीला ! समजलं का मि. स्टॅकन पॉट ? "

" पर्कन स्टॅकर ! " त्याने अदबीनें दुरुस्ती सुचविली.

" बरं, मि. पर्कन स्टॅकर, मी तुमच्याशी इतकं का बोलतें आहे, माहित आहे का ? चार लोकांचें जीवन, साधेंसुधें जीवन जगणाऱ्याशी मला बोलावेंसें वाटतें म्हणून ! माझ्या त्या कृत्रिम जीवनाचा वीट आला आहे मला ! पैसा ! पैसा !! पैसा !!! ते आजुबाजूचे इतर श्रीमंत लोक, तींच तीं नृत्यें, तेच ते अमोल अलंकार, हिरे, माणकं, रत्नं—तीच ती सारखी चैन ! नकोसं झालं आहे सारं तें ! "— तिच्या डोळ्यांत अश्रू येण्याचे फक्त उरले होते, इतकी कळवळून बोलत होती ती !

" मला वाटत होतं, सर्व सुखांचं साधन पैसा म्हणून ! " तो म्हणाला.

" थोडासा पैसा कांही वाईट नाही म्हणा परंतु अचाट संपत्ति ?— छे, नकोच ती ! सांगते ना, त्या मोटारी, ते दिवाणखाने, ते शेकडो नोकर–वीट येतो या साऱ्याचा ! खरं सांगूं ? शॅंपेन पितांना ग्लासांतला बर्फाचा तुकडा आतल्या आत काचेवर आदळून खट् असा अगदी हलका आवाज झाला तरी वाटतं, त्या आवाजानेहि वेडी होईन मी ! इतकी वैतागलें आहें मी !! "

त्याने आश्चर्याने तिच्याकडे पाहिलें,

" आम्हा सामान्य लोकांना तुमच्यासारख्या वैभवसंपन्न लोकांच्या आयुष्यक्रमाची माहिती मिळविण्याची फार उत्सुकता असते. तुम्हा लोकांशी गोष्टी बोलतांना मोठे रंगून जातो आम्ही ! तरी पण कांही केलं, तरी तुमच्या जीवनाची, चालीरीतींची माहिती आम्हांला कशी मिळणार ? कांही तरी बोलतों मग आम्ही ! हेंच पाहाना, परवा आमच्या पैकीच एकाने मला सांगितलें की, शॅंपेनची बाटलीच बर्फात ठेवून ती थंड करण्याचा तुमच्यांत प्रघात आहे. शॅंपेनच्या ग्लासांत बर्फ टाकीत नाहीत कुणी !! "

ती मनमोकळेपणाने हंसली.

" हें पाहा, आम्हा निरुपयोगी लक्षाधीश, कोट्याधीश लोकांची करमणूक म्हणजे उगीच कांही चालीरीति बदलून नव्या काढणें. ठराविक जीवनांत तेवढाच बदल ! आजकाल शॅंपेनच्या ग्लासांत बर्फ टाकायची टूम निघाली आहे. तो तुर्कस्थानचा राजपुत्र आला होता ना परवा ? त्याने प्रघात पाडला हा ! कांही दिवस थांबा, रंगित बर्फ तयार करवून तें टाकायचा प्रघात पडेल. या प्रघातांच्या मोजा सोडूनच द्या ! परवा त्या 'मेडिसन् अव्हेन्यू'तल्या पार्टींत प्रत्येक पाहुण्याला एकेक हिरवा हातमोजा देण्यांत आला होता. फळें खातांना एका हातांत घालायचा म्हणे तो ! आहे की नाही गंमत ? "

" तुमच्या जीवनांतल्या या घडामोडी आम्हांला कशा कळणार ? " तो म्हणाला

" एखाद्या वेळीं वाटतं, आपण कुठल्या तरी सामान्य मनुष्याचीच पत्नी व्हावें सुख हवं असलं तर ! कांही अर्थ त्या पैशांत ? पण माझ्या या निश्चयांतहि कांहीच अर्थ नाही म्हणा ! आमचं वैभव आड येणारच या निश्चयाच्या ! सध्याच तर दोघं जणं घोटाळताहेत माझ्या भोवती. एक आहे ग्रॅंड ड्यूक ! कसासाच आहे तो ! त्याच्या डोळ्यांत इतका दुष्टपणा भरलेला दिसतो नेहमी ! असं वाटतं, याचं पहिलं लग्न झालं असावं आणि याच्या दुष्टपणाला कंटाळून याच्या बायकोने आत्महत्या केली असावी–दुसरा आहे तो मार्किस !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तो तर इतका थंड, इतका निर्विकार, यंत्रच ते! त्यापेक्षा तो ड्यूक बरा! जिवंतपणा तरी आहे त्याच्यांत!— खूप बोलतें आहे मी, मि. पॅकन स्टॅकर, नाही का?"

"पर्कन स्टॅकर! पुन्हा त्याने अदबीने तिची चूक दुरुस्त केली व म्हटले, "तुम्ही कांहीहि बोलल्यांत, तरी त्यांतला एक शब्दहि बाहेर फुटणार नाही, याची खात्री बाळगा!!!

तिने त्याच्याकडे पुन: पाहिलें.

"काय धंदा करतां तुम्ही, मि. पर्कन स्टॅकर?"

"अगदीच सामान्य मनुष्य आहें मी! पण खूप मोठें व्हावेंसें वाटतें मला! पण तुमचा विवाह खरंच एखाद्या सामान्य नागरिकाशी झाला, तर आवडेल तुम्हांला?"

"न आवडायला काय झालं? पण सांगितलं ना, तो ग्रँड ड्यूक, तो मार्क्विस असलाच कुणी तरी नशिबीं येणार माझ्या! पण तुमचा धंदा?"

"एका हॉटेलांत आहें मी!"

"वेटर म्हणून?" तिने किंचित् दूर सरकत विचारलें.

"नाही! ती समोर पाटी दिसते आहे विजेच्या दिव्यांची अक्षरें काढलेली हॉ–टे–ल—, त्याच हॉटेलांत 'कॅशिअर' आहे मी! जाणाऱ्या गिऱ्हाइकांकडून पैसे घ्यायचं काम करावं लागतें मला!"

तिने आपल्या मनगटावरील लहानशा घड्याळाकडे नजर टाकली व पुस्तक घेऊन ती घाईघाईने उठली.

"मग आज कामावर नाही गेलां तुम्ही?" तिने विचारलें.

"रात्रपाळीचा कॅशिअर आहे मी! अजून तासभर अवकाश आहे मला! पुन: आपली भेट होऊं शकेल का?"

"काय सांगू?" पुन्हा इथं यावसं मला वाटलं, तर!— जायलाच पाहिजे आता मला! एका ठिकाणीं पार्टीला जायचं आहे; पार्टीहून मग नाटकाला! पीरी– माझा शोफर— वाट पाहून थकला असेल! रस्त्याच्या त्या उजव्या बाजूला वळणावर एक पांढऱ्या रंगाची मोटार उभी आहे तिच्यांतूनच आलें मी!

"समोरच्या काचांना तांबडी चौकट बसविलेली आहे, ती मोटार तर नव्हे?"

"हो, तीच! बरं, जातें मी आतां! पीरीला फसवून–स्टोअर्समध्ये खरेदीला जातें असें सांगून–आलें मी! आयुष्याने–आमच्याच आयुष्याने–आम्हांलाच कसं बांधून टाकलं आहे, बघा! शोफरलासुद्धा फसवावं लागतं थोडं स्वातंत्र्य हवं असलं तरी–बरं!"

"पण–पण अंधार पडला आहे आता. किती तरी असभ्य लोक या उद्यानांत व रस्त्यांत असतात अशा वेळीं! मी मोटारपर्यंत पोहोचवतों तुम्हांला—"

"छे, छे, सांगितलं ना, मी कोण आहें हें तुम्हांला कळूं द्यायचं नाही आहे मला! आणि, त्या मोटारवर मालकाच्या नांवांचीं आद्याक्षरें एकांत एक गुंफून सोनेरी रंगाने एक मोनोग्राम काढलेला आहे! मग तुम्ही मोटरपर्यंत येऊन कसं चालेल? मी इथून गेल्यावर दहा मिनिटांनी तुम्ही निघा–एवढं माझं ऐकलंच पाहिजे तुम्हांला! ऐकाल ना?"

"ठीक आहे!—बरं—!"

ती उठली आणि त्या उद्यानाबाहेर पडली. ती दृष्टीआड होतांच त्या तरुणाने तिचा पाठलाग करायला सुरवात केली.

त्या पांढऱ्या रंगाच्या, काचांना तांबडी चौकट लावलेल्या व सोनेरी अक्षरें एकांत एक गुंफून त्यांचा मोनोग्राम काढलेल्या त्या मोटारजवळ ती आली, तिने शोफरकडे पाहिल्यासारखे केलें व रस्ता ओलांडून पटकन् ती त्या–विजेच्या दिव्यांचीं 'हॉ–टे–ल' हीं अक्षरें असलेल्या–हॉटेलमध्ये शिरली.

तो तिच्या नकळत तिच्या मागोमाग त्या हॉटेलपर्यन्त आला होताच!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ती आंत शिरल्याबरोबर बाहेरच्या बाजूला टेबलाजवळ एका उंच स्टुलावर बसून, जाणाऱ्या गिऱ्हाइकांकडून पैसे घेण्याचें काम करणाऱ्या एका लाल केसांच्या छोकरीने स्टूलवरून उतरून तिला आपली जागा दिली. आणि भिंतीवरील मोठ्या घड्याळाकडे बोट दाखविलें.

हें पाहून तो हॉटेलच्या बाहेरच्या बाजूलाच थोडावेळ तिच्याकडे पाहत उभा राहिला व नंतर आपल्याशींच हंसल्यासारखें करून सरळ वर सोनेरी मोनोग्राम असलेल्या त्या लाल चौकटीच्या पांढऱ्या मोटारजवळ आला !

शोफरने त्याच्यासाठी दार उघडलें.

" हेन्री !— क्लब– " मोटारींत बसतां बसतां त्याने शोफरला हुकूम सोडला ! ! !

• • •

गुप्त सरस्वती

१ कै. डॉ. माधवराव पटवर्धन
२ प्रा. गणेश श्री. हुपरीकर

● या सदरांत मुख्यतः साहित्य व साहित्यिक यांच्यासंबंधींचीं खाजगीं पत्रें दिलीं जातात. अशीं पत्रें कुणाजवळ असल्यास तीं ' युगवाणी ' कडे अवश्य पाठविण्यांत यावीं. काम होतांच पत्रें ज्यांचीं त्यास परत करण्यांत येतील. साहित्याखेरीज इतर सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवरील पत्रें प्रसिद्ध करण्यांत येतील.

★ ★ ★

राजाराम कॉलेज, कोल्हापूर.
ता. ५ ऑक्टोबर १९३७

श्री. ना. ग. जोशी* यांस,

कृ. सा. न. वि. वि. आपलें पत्र पावलें.

ज्या मात्रावलींत ' गोमंतक ' काव्य रचण्यांत आलें आहे, तिची जाति मीं निर्माण केली आहे, असें मी कोठेहि म्हटलेलें नाही. नामकरण मी केलें आहे आणि तें सुद्धा कांही तरी नांव पाहिजे म्हणूनच केलें आहे. या जातींतील जुन्यांत जुने पद्य म्हणजे

" धन्य दिवस आज साधुसङ्गम लाधला !
सर्वहि शुभयोग पर्वकाळ साधला ॥ "

हें गोविंद वणीकर कवींचें होय, (पद्यसंग्रह २ । ३०३ पहा.) ' नोहे हा पवन जवन करूं भासतो ' या देवलांच्या पद्याचें ध्रुवपद जरी या मालावलींचें असलें, तरी काव्याची घटना वेगळी असल्याने या पद्यावरून घेतलेलें ' जलधारा ' हें नांव या समपद्याला देतां येत नाही. सर्व पद्य याच मात्रावलींत लिहिलेलें असें देवलांचें म्हणजे 'शापसंभ्रमां'तील "धवलचन्द्रिकाच काय पूर्ण साचली " हें होय. या जातीसंबंधाने मी 'छंदोरचने'च्या दुसऱ्या आवृत्तींत पुढील विधानें केलीं आहेत . ...कवींच्या पद्यांवरून जातींना नांवें मी दिलीं, त्यांत कवींच्या नांवांचा उल्लेख नाहीं. त्यांतूनहि हीं ' धवलचन्द्रिका ' जाति (मी शक्य तितक्या प्राचीन पद्यावरून जाति नांवें घेतलीं आहेत.) सावरकरांनी संस्कारिली, म्हणून तिला इतरांनी ' वैनायक ' म्हणणें जसें शोभेल, तसें सावरकरांनी स्वतः म्हणणें शोभणार नाही.

मला स्वतःला इंग्रजी Blank Verse पेक्षा कार्लाईल सारख्याचें गद्य अधिक रमणीय

* हल्ली बडोदे येथे राहणारे साक्षेपी साहित्यिक

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि काव्यमय वाटतें. तेव्हा मूळ Blank Verse विषयींच मी जेथे साशंक आहे, तेथे 'वैनायका' विषयींहि आहे, हें ओघानेच आलें. एखाद्या चरणारम्भींचे कांहीं शब्द पूर्वीच्या चरणांतील अन्त्य शब्दांशी जोडून घ्यावयाचे असल्यास चरणान्तीं केवळ खटका असावा; कांहीं मात्रांचा विराम असतां कामा नये. म्हणजे 'पादाकुलका' च्या चरणावलींत ही सोय आहे. 'वैनायकां' त ही सोय नाहीं. अन्तींचा विराम न घेतल्यास लय बिघडते आणि तो घेतल्यास जे शब्द अर्थदृष्ट्या जोडूनच उच्चारायला हवेत त्यांच्यांत खण्ड पडतो. तेव्हा 'ब्लॅङ्क व्हर्स' मध्ये एक चरणान्त जसा पुढील चरणांत घुसतो, तसा मराठी रचनेंत घुसतां कामा नये. खटके मात्र आवर्तनान्तीं एक वा दोन वा तीनहि घेतां येतात, ही सोय आहे.

अधिक काय लिहूं ! कळावें.

आपला

माधवराव पटवर्धन

कोल्हापूर

ता. १३-१-३५

प्रा. द. के. केळकर, पांचगणी यांस—

"Mysticism ला सध्याच्या वाचकांची मनोवृत्ति फारशी अनुकूल नाही," असें जें आपण म्हणतां, तें खरें आहे; व त्याला कांहीं कारणेंहि आहेत. त्यांपैकीं मुख्य कारण असें आहे कीं, बहुजनसमाजाची अंतर्मुखतेकडे क्वचितच प्रवृत्ति असल्याने, अंतर्मुख कोणतीहि कविता वाचतांना मनाची जी एक विशिष्ट बैठक ठेवावी लागते, ती ठेवण्याची सवय लोकांत फार थोडी असते; व यामुळे ते mysticism (अध्यात्मवादा) विषयीं फारसे अनुकूल नसतात. आता, अध्यात्मवादी कवितेला आपण आंग्लशिक्षित लोक सध्याच्या कालीं 'mysticism' असा शब्द जरी वापरतों, तरी तो इंग्रजी शब्द पूर्ण अर्थवाहक नाहीं; व mysticism हा शब्द हल्लीं प्रचारांत आणला गेला, एवढ्यावरूनच mystic poetry चें वळण इंग्रजीवरून आलें, असें जे कित्येकजण अनुमान करतात, तेंहि तर्कशुद्ध नाहीं. Mystic Poetry ही आह्मां पौरस्त्यांची वडिलोपार्जित संपत्ति आहे. इंग्रजी कवितेचीं इतर कांहीं वळणें जरी मराठी कवितेस लागलीं असलीं, तरी mystic poetry चें वळण मात्र बहुतांशीं स्वदेशी आहे, हें निःसंशय होय. ऋग्वेद, उपनिषदें, योगवासिष्ठ इ. तील उच्च आध्यात्मिक काव्यें आणि प्राकृत भाषांतील संतकवींचीं काव्यें हीं mysticism बाबतींत आपली पैतृक संपत्ति आहे. आता, कालमानाप्रमाणें पूर्वींहून हल्लींच्या mystic कवितेंत आविष्कार व शैली या दृष्टीने फरक झाला असेल व होत आहे, हें निराळें; व तसा फरक होणें नैसर्गिकहि आहे.

"काव्यापुरतें पाहिलें, तर निर्गुणापेक्षा सगुण व अद्वैतापेक्षा द्वैत हें अधिक अनुकूल आहे," असें जें आपण म्हणतां, तें कांहीं दृष्टींनी खरें आहे. कारण काव्यांत मूर्तग्राही (Concrete) भाषेंत मनश्चित्रें (Imagery) निर्मूनच त्यांतील अमूर्त भाव अथवा रस व्यक्त करावयाचा असतो; व तसेंच मीं 'मधुसंभारा' त केलें आहे, असें माझ्या अल्पमतीस वाटतें. काव्याकरिता द्वैताची जी भूमिका अद्वैती संतांनी घेतली आहे, ती अर्थातच कल्पित द्वैताची होय. हें कल्पित द्वैत गृहीत धरून व भाव व्यक्त करून त्या भावाचें व द्वैताचें अद्वैतांत पर्यवसान करण्याकडेच संतांचा कल असतो व कित्येक वेळीं तर त्यांनी केवळ अद्वैतानुभूतीचे उद्गारहि प्रकट केले आहेत.

उदाहरणार्थ—

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण ।
अंतरींची खूण पावोनियां ॥
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीलित ।
कंठ सद्गदित रोमांच आले ॥
चित्त चाकाटलें स्वरूपामाझारीं ।
न निघे बाहेरी सुखावलें ॥

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुनीळ प्रकाश उदेजला दिन ।
अमृताचें पान जीवनकळा ।।

शशि सूर्या जाली जीवें ओवाळणी ।
आनंदा दाटणी आनंदाची ।।

तुका ह्मणे सुखें प्रेमेंसी डुलत ।
विरालों निश्चित निश्चितीने ।।

—हा साधुवर्य तुकारामांचा अभंग पहा. सात्त्विक भावांच्या द्वारां प्रकट केलेले हे अद्वैती उद्गार द्वैती अभंगांतील उद्गाराहून कमी जिव्हाळ्याचे आहेत, असें वाटत नाही. द्वैती भावना जास्त परिचयाच्या असल्यामुळे कदाचित् त्या अधिक जिव्हाळ्याच्या वाटतील. शिवाय सर्वच भक्ति-रसाचें अधिष्ठान द्वैताचें असतें असें नाही. ज्ञाने-श्वरांनी उच्च अद्वैतभक्तीचें ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत जें सुरस व विस्तृत वर्णन केलें आहे, तें पाहावें; म्हणजे अद्वैत हेंहि भक्तीचें अधिष्ठान असतें, हें आपणांस पटेल. तसेंच, या अद्वैत भक्तींत रसाविष्कार होतच नाही, असें म्हणतां येणार नाही. त्या रसाला साहित्यशास्त्रानुसार अजून वेगळें अभिधान कोणी दिलें नसलें, तरी अद्वैत भक्तींत उच्च रसाविष्कार होतोच. उदाहरणार्थ, वरील अभंगांत रसाचा आविष्कार नाही, असें म्हणून चालणार नाही.

माझ्या ' मधुसंभारां 'त केवळ अद्वैतभावना व्यक्त करणाऱ्या कविता द्वैती भावनांच्या कवितांतून फारच कमी आहेत. तेथे कवितांचा आरंभ व विस्तार द्वैताने होऊन शेवटीं त्यांचें पर्यवसान अद्वैतांत होणें अशी मांडणी मात्र बऱ्याच कवितांची आहे. तसेंच पाहिलें, तर कोणत्याहि लौकिकार्थ-सूचक कवितेंत सुद्धा द्वैताचा प्रमुखत: अवलंब असला, तरी तींत ज्या ठिकाणीं उच्च आनंदाचा आविष्कार होतो, त्या ठिकाणी कवि आपोआपच समरस झालेला अतएव, अद्वैताकडे न कळत झुकलेला दिसतो. अर्थात् अध्यात्मवादी कवितेस हें तत्त्व तर अधिक प्रमाणांत लागू पडतें. तेव्हा माझ्या अध्यात्मवादी कवितेचें पर्यवसान जरी अद्वैतभावनेचे सूचक असलें, तरी काव्यरसपरिपोषासाठीं मीं बऱ्याच ठिकाणीं द्वैताचाच अवलंब करून सृष्टीचीं मूर्त मनश्चित्रें विस्तृतपणें रेखाटलीं आहेत. आता, या कवितांत ' ईश्वर ' व ' भक्त ' अशा अर्थाचे शद्ब स्पष्टपणें जरी संतकवींप्रमाणें वापरलें नसले, तरी एका विश्वव्यापी चिच्छक्तीवर वेगवेगळ्या प्रसंगाने सृष्टींतील विविध मूर्त पदार्थांचीं प्रतीकें (Symbols) योजून तत्तद्विषयक भाव व्यक्त केला आहे. अर्थात् हीं प्रतीकें कल्पित द्वैत प्राधा-न्यत: स्वीकारल्याचींच द्योतक आहेत.

—गणेश श्री. हुपरीकर

• • •

संपादकीय

लेखनाची तारीख १ मार्च १९४७

अनुकरण की आस्था ?

' युगवाणी 'त आरंभीं सर्व कविता एकदम देण्यांत येतात, हें ' अभिरुचि ' मासिकाचें अनु-करण होय, असें विधान केलेलें माझ्या अवलो-कनांत आलें आहे. ' अभिरुचि ' हें मराठींतील उच्च दर्जाचें मासिक आहे व त्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि मासिकाच्या चांगल्या गोष्टीचें अनुकरण करण्यांत ' युगवाणी ' ला कमीपणा वाटण्याचें कांहीच कारण नाही ! ' युगवाणी ' च्या संपादकाने मौलिकतेचा दावा कधीच केलेला नव्हता ! तथापि मला एवढें वाचकांच्या निद-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

र्शनास आणावयाचें आहे की, एकदम कविता देण्याची पद्धत मराठींत 'अभिरुची' ने प्रथम आणली, असें नाही. 'मनोरंजन', 'विविधज्ञान विस्तार'—वगैरे जुन्या मासिकांनी कांही काळ सर्व कविता एकदम देण्याची पद्धत अंमलांत आणली होती. फक्त त्या आरंभीं नव्हत्या, इतकेंच काय तें!

मराठींतील मासिकांची पूर्वीची पद्धत अशी की, गद्य मजकूर छापून झाल्यानंतर उरलेल्या जागेंत कविता कशा-बशा छापावयाच्या! ही रीत मला केव्हाच मान्य नव्हती. कवितेबद्दल मला आस्था वाटत असल्यामुळे कवितांना मीं स्वतंत्र व मानाचें स्थान द्यावयाचें ठरविलें होतें. त्यांत कुणाचेंहि अनुकरण करण्याचा मुळांत हेतु नव्हता.

लेखनसाहाय्य सर्वांचेंच हवें!

'युगवाणीं'त अमुक साहित्यिकाचें लिखाण का येत नाही, किंवा तींत तमुक साहित्यिकाचें लिखाण वारंवार का दिलें जात नाहीं, अशी पृच्छा क्वचित् करण्यांत येते. विदर्भावाहेरच्या साहित्यिकांचा प्रश्न तूर्त बाजूस ठेवून विदर्भांतील साहित्यिकांबद्दल येथे थोडा खुलासा करतों: विदर्भांतील नामवंत साहित्यिकांना लेखनसाहाय्याची विनंती वेळोंवेळीं करण्यांत येत असतेंच. तिला बहुतेकांनी मानहि दिला आहे, हें 'युगवाणी'चे वाचक जाणतातच. एखाद-दुसराच प्रथितयश साहित्यिक असा असेल की, ज्यानें माझ्या विनंतीप्रमाणें लेखनसाहाय्य केलें नसेल. पण त्याबद्दल मी त्यास दोष देऊं इच्छित नाही. या साहित्यिकांनी लेखनसाहाय्य करावें, इतकी योग्यता 'युगवाणी'ला अद्यापि आली नसेल व म्हणून हे साहित्यिक लेखनसाहाय्य करीत नसतील, असेंच मी समजतों. अर्थात् 'युगवाणी'ची योग्यता वाढविण्याचा प्रयत्न करीत राहण्यापलीकडे मी अधिक काय करूं शकतों!

अर्थात् मीं बुद्ध्या कुणासहि वगळलेलें नाहीं, हें आता वाचकांच्या निदर्शनास येईल.

विदर्भीय साहित्यिकांचें उत्तमोत्तम लिखाण 'युगवाणीं'तच यावयास पाहिजे, तें विदर्भा-बाहेरच्या मासिकाकडे जातां कामा नये, असेंहि एक पत्रलेखक सुचवितात. पण असा आग्रह धरणें मला तरी उचित वाटत नाही. विदर्भीय साहित्यिकांचे ऋणानुबंध बाहेरच्या मासिकांशीहि असतात; तेव्हा ते संबंध त्यांनी विसरून 'युग-वाणी'लाच फक्त लेखनसाहाय्य करावें, असें म्हणणें कितपत समंजसपणाचें ठरेल? विदर्भा-बाहेरच्या मासिकांप्रमाणेंच 'युगवाणी' चेंहि विदर्भीय साहित्यिकांनी स्मरण ठेवावें, एवढेंच फार तर म्हणतां येईल!

स्वत: मला विदर्भांतील साहित्यिक व विदर्भा-बाहेरचे साहित्यिक असा भेदभाव करणें किंवा असे दोन प्रकार मानणें बिलकूल पसंत नाही. जातीयते प्रमाणेंच प्रांतीयताहि आपण जितक्या लवकर नष्ट करूं, तितकें चांगलें. याच दृष्टीने विदर्भांतील साहित्यिकांप्रमाणेंच विदर्भाबाहेरच्या साहित्यिकांचेंहि लेखनसाहाय्य मिळविण्याची मी नेहमीच खटपट करीत असतों.

जून १९४८ पूर्वी स्वातंत्र्य?

ब्रिटनचे मुख्य प्रधान मि. ॲटली यांनी २० फेब्रुवारी रोजीं पार्लमेंटांत एक घोषणा करून सर्व जगाला आश्चर्याचा धक्का दिला आहे! जून १९४८ पर्यंत हिंदुस्थानवरील ब्रिटनचें साम्राज्य संपुष्टांत येणार, अशी ही घोषणा आहे! ही घोषणा बारकाईनें वाचली आणि तिची इंग्लंड, अमेरिका व हिंदुस्थान या देशांतील प्रतिक्रिया पाहिली, म्हणजे सामान्य माणूस भांबावूनच जातो! ब्रिटिशांच्या प्रामाणिकपणाबद्दल कितीहि गैरविश्वास बाळगला, तरी पण हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य फार काळ टिकणें अशक्य आहे, हें निर्विवाद आहे. प्रश्न आहे तो हा की, हिंदुस्थान अखंड राहून तो स्वतंत्र कसा होणार.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काँग्रेस, मुस्लिम लीग व संस्थानें यांच्यांत एकमत न झाल्यास हिंदुस्थानचे तुकडे तुकडे पडणार की काय, अशी यथार्थ भीति वाटत आहे! एका-परीनें काँग्रेस व संस्थानें यांच्यांत एकोपा होऊं शकेल; पण मुस्लिम लीग व काँग्रेस यांच्यांत 'समझोता' होणें आज तरी दुर्घटच दिसतें! विशेषत: सिंध, पंजाब, बंगाल व अंशत: आसाम यांत मुसलमानांची जी वाढती आक्रमणशीलता दृग्गोचर होते, ती लक्ष्यांत घेतां भविष्य काळा-बद्दल कुणीहि सचिंतच होईल! जून १९४८ नंतर हिंदुस्थानांतून ब्रिटिश लष्कर काढून घेण्यांत येण्याची भाषाहि जबाबदार लोक बोलूं लागले आहेत, ही वस्तुस्थिती देखील या चिंतेंत भरच घालणारी आहे!

काँग्रेसने येऊं घातलेल्या स्वातंत्र्यास सामोरें जावयास पाहिजे, याविषयीं दुमत नाही. पण तसें करतांना तिनें सामर्थ्यसंपन्नहि व्हावयास पाहिजे. काँग्रेसच्या शासनाखालील प्रांतांत सैन्यवजा दलें तातडतोब उभारण्यांत आलीं पाहिजेत. तरच खरेंखुरें स्वातंत्र्य मिळेल व मिळालेलें स्वातंत्र्य टिकेल! रा. शंकरराव देव यांच्यासारखे जबाबदार काँग्रेस-कार्यकर्ते आपण हातांत लाठी घेणार नाही, असे जाहीर उद्गार काढून बलोपासनेबाबत जनतेचा बुद्धिभेद करतात, असें म्हणणें प्राप्त आहे! इतरहि काँग्रेसश्रेष्ठींची अशीच विचारसरणी अस-ल्यास मग भवितव्य बिकटच दिसतें म्हणावयाचें! असो. काँग्रेसच्या मुत्सद्देगिरीच्या कसोटीची ही वेळ आहे, यांत शंका नाही!

वऱ्हाड निजामकडे जाणार ?

वऱ्हाड प्रांत निजामकडे जाणार असल्याच्या बातम्या पुन: पुन्हा उठतात! अ‍ॅटली यांच्या घोषणेचें स्वरूप पाहतां निजामाला वऱ्हाडची मागणी करण्यास जागा होणार की काय, असें वाटूं लागतें! याबाबत काँग्रेसने निश्चित मार्गदर्शन करावें, अशी खटपट ना. बियाणी, बॅ. पंजाबराव देशमुख प्रभृति पुढाऱ्यांनी करावयास पाहिजे. वऱ्हाड निजामकडे जाण्यास आपण अनुकूल नाही, असें या दोन्ही लोकनेत्यांनी जाहीर केलेलेंच आहे. तशींच वेळ आल्यास हे पुढारी आकाश-पाताळ एक केल्याशिवाय राहणार नाहीत, असा दृढ विश्वास वाटतो!

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 943

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२५ मुधोळकर पेठ येथे प्रकाशित केलें.

किरकोळ अंकास ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ